# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**विरार (जि.पालघर) मधील म्हाडा वसाहतींना कायमस्वरुपी नळ पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(१) १२० (१६-०३-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने विरारमध्ये (जि.पालघर) बांधलेल्या २४ मजली इमारतीमध्ये गत ६ वर्षापासून ४० हजार लॉटरी विजेत्या धारकांचा निवास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या कोकण मंडळाने विरार बोळींज येथे उभारलेल्या गृहसंकुल प्रकल्पात प्राथमिक सोयीसुविधांचा अभाव असून अनेक त्रुटी राहील्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतीमध्ये राहणाऱ्यांना कायमस्वरुपी नळ पाणी पुरवठा करण्यासाठी इमारतीमधील रहिवाश्यांनी म्हाडा व महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊन मागणी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, म्हाडा वसाहतीला पाणीपुरवठा होण्यासाठी वसई-विरार महानगर पालिकेकडून पाईप लाईन टाकण्याचे काम गेल्या दीड वर्षांपासून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या इमारतीतील रहिवाश्यांना ठेकेदार कंपनीकडून टँकरव्दारे पाणी पुरवठा होत असून सदर पाणी दुषीत आणि दुर्गंधीयुक्त असल्याने रहिवाश्यांचे आरोग्य धोक्यात येऊन रोगराईचा प्रादुर्भावही झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, नियमित व सुरळीतपणे पाणीपुरवठा व्हावा म्हणून तेथील रहिवाश्यांनी तत्कालीन मा.गृहनिर्माण राज्यमंत्री, सभापती, कोकण गृहनिर्माण मंडळ, आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका तसेच वसई-विरार महानगरपालिकेतील अधिकारी व गृहनिर्माण मंडळाचे संबंधित अधिकारी यांचेसमवेत दिनांक २१ मे, २२ सप्टेंबर व १५ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठकींमध्ये महानगरपालिकेने पाईपलाईनद्वारे काम तातडीने पूर्ण करावे असे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, त्याबाबतचे सविस्तर निवेदन दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री महोदयांना देखील देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही,
म्हाडा प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, म्हाडाने विरार बोळींज येथे बांधलेल्या (अल्प उत्पन्न गट - ७४८५ सदनिका व मध्यम उत्पन्न गट - १८६५ सदनिका) इमारतींना जानेवारी, २०१८ मध्ये भोगवटा प्रमाणपत्र वसई विरार शहर महानगरपालिकेकडून प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांना सदनिकांचा प्रत्यक्ष ताबा देण्यास सुरुवात झाली आहे. माहे सप्टेंबर, २०२० पर्यंत एकूण १७५९ लाभार्थ्यांना सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आलेला आहे.
(२), (३) व (४) म्हाडा प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, विरार बोळींज या वसाहतीस सर्व सुविधा दिलेल्या आहेत. म्हाडाने जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण करुन वसई विरार शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. तसेच, म्हाडाने जलवाहिनी जोडणीसाठी वसई-विरार महानगरपालिकेकडे वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे.

तसेच, आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी नगर विकास विभागास सादर केलेल्या अहवालानुसार, म्हाडाच्या बोळींज येथील संकुलास पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने विरार पूर्व, चंदनसार मुख्य संतुलन टाकीपासून ६०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे अमृत पाणी पुरवठा योजनेतून प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर जलवाहिनीच्या मार्गिकेत मुख्यत: रेल्वे क्रॉसींग ह्या कामाचा समावेश होता व २ स्थानिक शेतकरी त्यांच्या जागेतून जलवाहिनी अंथरण्यासाठी हरकत घेत होते. जून,२०२० मध्ये रेल्वे क्रॉसींग कामी रेल्वे प्रशासनाकडून परवानगी तसेच, २ शेतकऱ्यांकडून सशर्त सहमती प्राप्त झाली असून ऑक्टोबर,२०२० पासून काम सुरु करण्यात आले आहे. सदर जलवाहिनीचे संपूर्ण काम माहे मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सद्यस्थितीत म्हाडाने ताबा दिलेल्या १७३८ सदनिकांसाठी आवश्यक ०.९० द.ल.लीटर पाण्याच्या अनुषंगाने १७० नळ जोडण्या महापालिकेने जून, २०२० मध्ये मंजूर केल्या आहेत. त्याची प्रत्यक्ष जोडणी माहे ऑक्टोबर अखेर पूर्ण झाली असून चाचणी सुरु आहे.
(५) हे खरे नाही.

म्हाडाच्या बोळींज येथील रहिवाशांसाठी आवश्यक शुध्द पाणी महापलिका पारोळ व महानगरपालिकेच्या पेल्हार येथील जल शुध्दीकरण केंद्रावरुन टँकरद्वारे म्हाडातर्फे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(६) व (७) होय.

तत्कालिन मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्याकडे बैठका संपन्न झाल्या. सदर बैठकमध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अधिका-यांना पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा सुरु करावा अशा सूचना केल्या आहेत.

तसेच, सदर प्रकरणी मा.मंत्री,गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९ जुलै,२०२० रोजी पार पडलेल्या बैठकीत सदर प्रकल्पाच्या रहिवाश्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यात यावा. त्यासाठी पुढील १५ दिवसात पाण्याच्या एका जलवाहिनीचे काम पूर्ण करुन त्याद्वारे सदर प्रकल्पातील रहिवाशांना पाण्याचा पुरवठा करण्यात यावा. अन्य दोन जलवाहिन्यांचे काम डिसेंबर, २०२० पर्यंत पूर्ण करण्यात यावे असे आदेश देण्यात आले आहेत.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

**नागपूर येथे म्हाडाकडून अधिग्रहण झालेल्या भुखंडावर बांधकाम झाल्याबाबत**

**(२) ३९७ (१६-०३-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे म्हाडाकडून अधिग्रहण झालेल्या भुखंडावर बांधकाम झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिग्रहण केलेल्या भूखंडावर नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने बांधकाम करून गाळे विकले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काटोल रस्त्याच्या पोच मार्गाला लागून इमारती न बांधता दूर बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०८-११-२०२१) :** (१) नाही.

(२), (३) व (४) म्हाडाकडून अधिग्रहित झालेला भुखंड काटोल रोडवर असून काटोल रोड परिसरामध्ये नागरी जमीन कमाल धारणा कायद्याअंतर्गत अतिरिक्त घोषित झालेली मौजा बोरगांव ता.जि. नागपूर येथील एकंदर १०६८१.०९४ चौ.मी. जमीन नागपूर मंडळास वाटप करण्यात आली असून सदर जमीन काटोल रस्त्यापासून अंदाजे ०.५०० कि.मी. ते १.०० कि.मी. अंतरावर आहे.

सदर जमीनीवर नगर भुमापन कार्यालयाने केलेल्या जमीनीच्या संयुक्त मोजणीनुसार मंडळाने ४७ भुखंड अल्प उत्पन्न गट, २९ भुखंड उत्पन्न गट व १२ भुखंड अल्प उत्पन्न गट योजना राबविल्या असून सर्व गाळा / भुखंडाचे लाभार्थ्यांना वाटप केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाअंतर्गत राज्यात अनेक स्वराज्य संस्था क्षेत्रात उभारलेली घरकुले विनावापर पडून असल्याबाबत**

**(३) ५७२ (०६-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाअंतर्गत राज्यात अनेक स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रात उभारलेली घरकुले विनावापर पडून असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेतून ही घरे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला होता मात्र उक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने पुन्हा एकदा निर्णय घेवून सदर घरकुले गरजू लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२०-१०-२०२१) :** (१) केंद्र शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनेंतर्गत २९९५२ घरकुले दिनांक २५.०९.२०१८ पर्यंत अवितरीत होती.

(२) व (३). एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनेंतर्गत बांधकाम पूर्ण झालेल्या घरकुलांपैकी दि.२५.०९.२०१८ रोजीपर्यंत एकूण २९९५२ घर कु ल े वितरीत करण्यात आली नव्हती. सदर घरकुले प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत वितरीत कर ण्याकरीता गृहनिर्माण विभागाने दि.२५.०९.२०१८ रोजी शासन निर्णय व तद्नंतर दि.२६.१०.२०१८ रोजीचे शासन शुद्धिपत्रक निर्गमित के ले आहेत. सदर शासन निर्णय व शुद्धिपत्रक यांच्यानुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था ंच्या स्तरावरुन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांचे पंचमाने करण्याबाबत**

**(४) ३०१० (२७-०७-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हाधिकारी आणि कृषी अधिकाऱ्यांना जिल्हयातील पंचनाम्यांची माहिती देण्याची विनंती केली केंद्र व राज्यसरकारने सर्व पिकांच्या झालेल्या नुकसानाची सरसकट कर्जमाफ करावी तसेच शेतक-यांना सवलतीत कर्जपुरवठा करावा, कर्जावर व्याज घेऊ नये शेतक-यांकडील वसुली बंद करावी तसेच कोणत्याही अटी शर्तीविना शेतक-यांचे सरसकट पंचमाने करावेत अशी मागणी बहुतांश लोकप्रतिनिधी करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-११-२०२१) :**(१) माहे ऑक्टोंबर- नोव्हेंबर २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे राज्यात अवेळी पाऊस होऊन मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. शेती पिकांच्या नुकसानासाठी आर्थिक मदत, कर्जमाफी, विमा कंपन्यांकडून पीकविमा रक्कम मिळवून देणे इत्यादी मागण्यांबाबतची निवेदने लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाली आहेत.

(२) "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे राज्यात अवेळी झालेल्या पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासंदर्भात शासनाने दिनांक १८.११.२०१९ च्या शासन निर्णयान्वये खालील प्रमाणे मदत व सवलती देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**अ) पिकांचे नुकसान - मदत :**

शेतीपिके - रु. ८,०००/- प्रति हेक्टरी

बहूवार्षिक पिके (फळबाग) - रु. १८,०००/- प्रति हेक्टरी

शेतिपिके/फळपिके नुकसानीसाठी २ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत उपरोक्त मदत अनुज्ञेय आहे.

**ब) सवलती :**

१. जमीन महसूलात सुट

२. शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयीन परीक्षा शुल्कात माफी.

शासनाने घेतलेल्या वरील निर्णयानुसार बाधित शेतकऱ्यांना एकूण पाच टप्प्यात आतापर्यंत रु. ७६४४.४८ कोटी निधी व मत्स्य व्यवसाय नुकसानीसाठी रु. ३.५१ कोटी निधीचे वितरण विभागीय आयुक्तांना करण्यात आले आहे.

तसेच राज्यातील सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या सलग चार वर्षातील राज्याच्या विविध भागातील नैसर्गिक आपत्ती तथा दुष्काळ सदृष्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून शेतीशी निगडीत कर्जाची परतफेड झालेली नाही. त्यामुळे शेतकरी थकबाकीदार होऊन नव्याने पीक कर्ज घेण्यास अपात्र असल्याने या पार्श्वभुमीवर सन २०१९-२० मधील पीक कर्ज वाटप असमाधानकारक झाले आहे. या बाबी विचारात घेऊन शासनाने दिनांक २७.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या योजनेची घोषणा केली आहे.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत सुमारे ३१.५१ लाख कर्जखात्यांवर रु. २०,१०९ कोटी मंजूर करण्यात आले असून त्यापैकी ३१.४१ लाख कर्जखात्यांमध्ये रक्कम रु. २०,०५९ कोटी रक्कमेचा लाभ वर्ग करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विकलांग व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याऱ्या कायद्‌याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(५) ५५४७ (०५-०४-२०२०). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विकलांग व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनाने तीन वर्षापूवी केलेल्या सुधारित कायदयाची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी होत नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तीव्र नापसंती दर्शविण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुधारित कायदयाची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. धनंजय मुंडे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) केंद्र शासनाचा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ दि.१९.०४.२०१७ पासुन संपुर्ण देशभरात लागु केलेला असुन सदर कायदयाची राज्यात कसोशीने अंमलबजावणी होत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुड व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यामध्ये संत्रा फळ प्रक्रिया क्लस्टर प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(६) ६३१८ (०५-०४-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड व मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यामध्ये संत्रा फळ प्रक्रिया क्लस्टर प्रकल्प शासनाने मंजूर केला आहे काय,
(२) असल्यास, उक्त क्लस्टर प्रकल्प मंजूर करून निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (१६-११-२०२१) :** (१) होय
(२) उक्त प्रकल्पासाठी शासनाकडून निधी मंजूर नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जोगेश्वरी (मुंबई) येथील रेल्वे पादचारी पुलाच्या कामाबाबत**

**(७) १००६४ (०३-०६-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील रेल्वे फाटकातील अपघात टाळून सुरक्षित रहदारीसाठी रेल्वे पादचारी पुल उभारण्याकरिता रेल्वे प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने माहे मार्च, २०११ मध्ये वा त्या दरम्यान महानगरपालिकेने रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत काम करण्यासाठी रेल्वेला जवळपास २ कोटी ५७ लाख ५३ हजार रुपये इतकी रक्कम अदा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रेल्वे पादचारी पुलाच्या कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका आयुक्त, कार्यकारी अभियंता यांच्यासमवेत अनेकदा कामाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना देवूनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेसमवेत झालेल्या संयुक्त बैठकीत सदरहू काम माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण करण्याचे आश्वासन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रेल्वे पादचारी पुलाच्या कामास जवळपास ९ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊनही अद्याप सदर रेल्वे पादचारी पुलाचे काम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू रेल्वे पादचारी पुलाचे काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे तसेच या प्रकरणी होणाऱ्या विलंबास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदर पादचारी पुलाचे काम रेल्वेमार्फत करण्यात आले असून, सदर पुलावरुन पादचाऱ्यांकरिता वाहतूक सुरु करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तलासरी नगरपंचायत (जि.पालघर) हद्दीतील आदिवासी वस्ती सुधारणा योजनेतून सीसी पाईप टाकून अंतर्गत गटाराचे केलेल्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(८) १२८८७ (१३-०७-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तलासरी नगरपंचायत (जि.पालघर) हद्दीतील धिंडेपाडा येथे सन २०१८-१९ या कालावधीत ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेतून सीसी पाईप टाकून अंतर्गत गटाराचे बांधकाम जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु कामात अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने आदिवासी वस्तीच्या नावाने निधीचा गैरवापर करून अकृषिक जमिनी क्षेत्र असलेल्या भागात गटाराचे बांधकाम करण्यात येत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संपूर्ण कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून संबंधीत विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. के.सी.पाडवी (११-११-२०२१) :** (१) होय,
(२) व (३) हे खरे नाही.
ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेअंतर्गत धिंडेपाडा, ता. तलासरी, जि. पालघर येथील गटार बांधकामासंदर्भात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणु या कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्याचे प्रकल्प कार्यालयाने नमुद केले आहे.

(४) सदर प्रश्नाचे अनुषंगाने धिंडेपाडा येथील गटार बांधकामाची एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणु यांच्याकडुन प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली होती. सदर पाहणीमध्ये या ठिकाणी आदिवासी वस्ती अत्यंत कमी प्रमाणात असल्याचे तसेच सदर गटारीचा उपयोग हा आदिवासी वस्तीत होत नसल्याचे दिसुन आले.

सदर पाहणी अहवालानुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंध व अपंग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(९) १३२१२ (२०-०९-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंध, अपंग विद्यार्थ्यांसाठी सन २०१८ या कालावधी पुस्तक खरेदी, मदतनीस खर्च, देखभाल भत्ता Rs.२३०-Rs.३८० गट-४ , Rs.३०० -५७० गट-३, Rs.५३० -८२० गट-२, Rs.५५०-१२०० गट-१ करिता Day Scholar and Hostelers Scholar म्हणून कोर्स विभागणी करून शिष्यवृत्ती दहा महिन्यांसाठी दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अडीच लाख वार्षिक उत्पन्नधारक व उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या एससी व एसटी विद्यार्थ्यांना पूर्ण देय फीससह दिली जाते तसेच दूरस्थ (Distance Mode) द्वारा शिक्षण घेणाऱ्यानांही ही पूर्ण देय शुल्क परत केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिष्यवृत्ती वाटपाचा अनेक विनाअनुदानित महाविद्यालयांनी गैरफायदा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील कोविड रुग्णालयात कोरोनाने मृत्यू झालेल्या एक रुग्ण अंतिमसंस्कारानंतर जिवंत असल्याची घटना

**(१०) १३७५६ (१४-०९-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय **:**

(१) ठाणे येथील कोविड रुग्णालयात कोरोनाने मृत्यू झालेला एक रुग्ण अंतिम संस्कारानंतर जिवंत असल्याची घटना दिनांक ६ जुलै २०२० रोजी व त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोविड रुग्णालयातील कर्मचा-यांच्या निष्काळजीमुळे सदर घटना घडल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय'
(३) असल्यास, यास जबाबदार असण्या-या संबंधीत दोषी कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यासह अश्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१०-२०२१) :** (१) व (२) ठाणे महानगरपालिकेच्या अधिनस्त ग्लोबल इंम्पॅक्ट हब, बाळकुम, ठाणे येथील कोविड रुग्णालयात दाखल रुग्ण भालचंद्र गायकवाड जिवंत असतांना त्यांच्या नावाने मृत्यू दाखला दिल्या गेल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे
(३) सदर प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही केली असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे:-
* उपरोक्त प्रकरणाचे गांभिर्य विचारात घेऊन आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी माहे जुलै, २०२० मध्ये चौकशी समितीची नियुक्ती केली आहे.
* सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार उपरोक्त घटनेच्या दोषी विरुध्द तात्काळ कारवाई केली असून तत्कालीन वैद्यकिय अधिक्षक यांची बदली व संबंधीत परिचारीकांना बडतर्फ करण्यात आले आहे.
* तसेच कोविड रुग्णालयाच्या कामकाजात सुधारणा आणण्याच्या दृष्टिने उक्त चौकशी समितीने दिलेल्या विविध शिफारशींची अंमलबजावणी ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) १९४५३ (२३-११-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद (ता. जि.औरंगाबाद) शहरात सन २०१६ या कालावधीत सुमारे २ कोटी रुपये खर्च करून सेफ सिटी प्रकल्पांतर्गत ४८ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्व ४८ सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्तीअभावी बंद पडले असून गुन्ह्यांची उकल करण्याकरिता व गुन्हे रोखण्याकरिता सदरहू सीसीटीव्ही कॅमेरे अत्यंत महत्वाचे काम करीत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून औरंगाबाद शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१०-२०२१) :** (१) औरंगाबाद शहरात सेफ अँड स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत लावण्यात येणाऱ्या कॅमेरांची संख्या ४८ ऐवजी ५० इतकी करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार एकूण ५० सीसीटीव्ही कॅमेरांपैकी ३२ सीसीटीव्ही कॅमेरे आजमितीस चालू स्थितीत आहेत, तर उर्वरीत १८ सीसीटीव्ही कॅमेरांची दुरुस्ती ही औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचेकडून करण्यात येत आहे.

---

**परळी नगरपरिषद (जि.बीड) येथे नगरोत्थान योजनेअंतर्गत भुयारी गटार योजनेची कामे निकृष्ठ दर्जाची झाली असल्याबाबत**

**(१२) २०२६४ (२५-१२-२०२०). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी नगरपरिषद (जि. बीड)येथे नगरोत्थान योजनेअंतर्गत भुयारी गटार योजनेची कामे निकृष्ठ दर्जाची झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम ठेकेदाराने अंदाजपत्रकानुसार केले नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी वारंवार केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामे बरोबर न करता ३० कोटी रुपयांची बिले उचलण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मंत्री नगरविकास तथा प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना निवेदन देऊन चौकशी करून कारवाई करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-१०-२०२१) :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये १०१.८६ कोटी किंमतीच्या परळी शहर मलनिस्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

• सदर प्रकल्पाचे काम परळी नगरपरिषद व प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांच्या देखरेखीखाली प्रगतीपथावर आहे.

• सदर प्रकल्पात वापरण्यात येणारे साहित्य,पाईप, मिक्स डिझाईन व मटेरीअल यांची तपासणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याकडून करून घेण्यात आलेली आहे.

(२) सदर प्रकल्पाच्या कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा गुणात्मक अहवाल व करण्यात आलेल्या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांच्यामार्फत केलेले आहे. तसेच सदर प्रकल्पाचे काम निविदेतील अंदाजपत्रकानुसार केले असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

(३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत परळी मलनिस्सारण प्रकल्पाच्या कामाचे परळी नगरपरिषद द्वारे माहे जानेवारी २०२१ अखेरपर्यंत एकूण रुपये १०.४३ कोटी इतक्या रकमेचे देयक कंत्राटदारास अदा करण्यात आले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) सदर योजनेतील कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले असून त्याबाबतच्या अहवालानुसार योजनेतील कामे समाधानकारक झाल्याचे आढळून आले आहे.

---

**भिवंडी शहरातील परशुराम टावरे स्टेडियम नुतनीकरण करणेबाबत**

**(१३) २०२८० (१३-१२-२०२०). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील परशुराम टावरे स्टेडियमचे नुतनीकरणासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहरामध्ये केवळ एकच स्टेडियम उपलब्ध असुन त्याची देखील दुरावस्था झालेली आहे आणि योग्य देखभाली अभावी ते मोडकळीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी तसेच, त्याचा लाभ घेता यावा, खेळाडूंना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळता यावे यासाठी परशुराम टावरे स्टेडियमचे नुतनीकरण करण्याबाबतच्या कामास मंजुरी व निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१०-२०२१) :** (१) होय. सदर विषयाबाबचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सदर स्टेडियमची दुरावस्था झालेली असून महानगरपालिकेमार्फत देखभाल दुरूस्तीकरिता वेळोवेळी खर्च केला जात आहे. तथापि, सदरचे स्टेडियम मोडकळीस आले नसल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य सन २०१६-१७ अनुदान अंतर्गत सदर ठिकाणी बंदिस्त प्रेक्षागृह बांधण्यासाठी रुपये ६७.५० लक्ष इतका निधी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्यामार्फत मंजूर करण्यात आलेला आहे.

सदर कामी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक ०३.०३.२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आले असल्याची बाब भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कॉमन युनिफाइड डी.सी.आर.चे भिवंडी शहरावर होणारे परिणाम आणि त्याची शहराच्या विकासासाठी एक त्रिसदस्यीय तांत्रिक सल्लागार समिती गठीत करण्याबाबत**

**(१४) २०२९७ (२२-०३-२०२१). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉमन युनिफाइड डी.सी.आर.चे भिवंडी शहरावर (जि.ठाणे) होणारे परिणाम आणि त्याची शहराच्या विकासासाठी आवश्यकता याकरिता त्याचा अभ्यास करण्यासाठी एक त्रिसदस्यीय तांत्रिक सल्लागार समिती गठीत करण्याबाबत लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार एमएमआर भागामधील मुंबई वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा एक कॉमन युनिफाइड डी.सी.आर. बनवावा परंतु भिवंडी शहर हे एक औद्योगिक शहर असल्याने औद्योगिकीकरणा सोबतच येथील जमिनीचा इतर वापर होत असल्यामुळे कॉमन युनिफाइड डी.सी.आर.चे भिवंडी शहरावर होणारे परिणाम आणि त्याचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी एक त्रिसदस्यीय तांत्रिक सल्लागार समिती गठीत करण्यात यावी व यामध्ये आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका आणि दोन शहर नियोजक (टाऊन प्लॅनर) यांचा समावेश करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन त्रिसदस्यीय तांत्रिक सल्लागार समिती गठीत करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-१०-२०२१) :** (१) यासंदर्भातील मा. स्थानिक विधानसभा सदस्य यांचे निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही.

(२) राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व काही नियोजन प्राधिकरणे/ विशेष नियोजन प्राधिकरणे/ विकास प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रांसाठी आणि प्रादेशिक योजना क्षेत्रांसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (Unified Development Control And Promotion Regulations) दि.०२/१२/२०२० रोजी मंजूर झाली असून दि.०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली आहे. सदर नियमावली भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राकरीता देखील लागू आहे.

(३) व (४) याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नसल्यामुळे त्यामधील मागण्यांबाबत कार्यवाही करता येत नाही. तथापि, यासंदर्भातील निवेदन शासनास प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत गुणवत्तेनुसार सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयात आदिवासी सुशिक्षित बेरोजगारांची प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत नोंदणी होण्याबाबत

**(१५) २०३१९ (१५-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात आदिवासी सुशिक्षित बेरोजगारांची प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत नोंदणी होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे पत्रान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने आदिवासी सुशिक्षित बेरोजगारांची प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत तातडीने नोंद होवून त्यांना नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (११-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उक्त निवेदनाचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेबाबत शासनाचे दिनांक ०९.११.२०२० रोजीचे पत्रान्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू व जव्हार यांना कळविण्यात आलेले आहे.

तसेच, आदिवासी विकास शासन परिपत्रक क्र. बीसीसी-१०८९/२१८५९/प्र.क्र.८०८/का-१५, दिनांक १६ सप्टेंबर, १९८९ नूसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर यांना तत्कालीन ठाणे जिल्हयाकरिता नांव नोंदणी नियंत्रक तथा पुरस्कर्ता अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणु व जव्हार कार्यालयात सेवायोजन विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या उमेदवाराची नोंदणी करण्यात येते. सदर नांव नोंदणी करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या सुशिक्षित बेरोजगारांची यादी ही प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येते. त्यानूसार प्रकल्प कार्यालय, शहापुर यांचे कार्यालयात प्राप्त सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांची नावे नोंदवून ती विविध नियुक्ती अधिकाऱ्यांकडे पात्र उमेदवारांची शिफारस करुन पाठविण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) नवनगर विकास प्राधिकरणाच्या मोशी स.नं.१४ येथील नियोजित जागेवर न्यायालयीन इमारतीच्या बांधकामास निधीच्या उपलब्ध करणेबाबत

**(१६) २०३४६ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहर व परिसरातील फौजदारी व दिवाणी ३५ हजार दावे, खटले न्यायादानाच्या प्रतिक्षेत प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे सुमारे १२०० आजीव वकील सभासद हे मोरवाडी व आकुर्डी येथील फक्त सहा कनिष्ठतर न्यायाल्याच्या अपुऱ्या जागेतून कार्यरत आहेत, हे ही खेर आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पंधरा पोलीस स्टेशनांपैकी काही पोलीस स्टेशनचे काम पुणे येथील कोर्टामध्ये होत असून अपुऱ्या न्यायादानाच्या प्रक्रियेमुळे पोलीस , पक्षकार वकील वर्ग, न्यायालयीन कर्मचारी यांना मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहराची वाढती गरज लक्षात घेता पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मोशी येथील स.नं.१४ मधील ६.५७ हेक्टर जागा कनिष्ठतर, वरिष्ठतर, जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच न्यायालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी राखीव ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मोशी से.नं.१४ येथील नियोजित न्यायालयीन इमारतीच्या पहिल्या टप्प्यातील बांधकामाकरिता अंदाजे एक कोटी रुपयाचा निधी तातडीने मंजूर करण्याबाबत चिंचवड लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०४/११/२०२० रोजी वा त्या सुमारास मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मोशी (पिंपरी-चिंचवड) से.नं.१४ येथील नियोजित जागेवर न्यायालयीन इमारतीच्या बांधकामास निधीची उपलब्धता होणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (१६-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मोशी से.नं.१४ येथील नियोजित जागेवर न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. परंतु, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १३ नोव्हेंबर, २०१९ च्या पत्रासोबत महाराष्ट्र राज्यातील न्यायालयांचा विकास आराखडा २०२०-२५ सादर केला आहे. सदर आराखड्यानुसार न्यायालयीन इमारतींच्या कामांची लघु मुदतीची कामे, मध्यम मुदतीचीच कामे व दिर्घ मुदतीची कामे अशी विभागणी करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत लघु मुदतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे काम अंतिम टप्प्यात असून मध्यम मुदतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे. पिंपरी-चिंचवड येथे न्यायालयीन इमारत बांधणे हे काम न्यायालयाच्या विकास आराखड्यात मध्यम मुदतीच्या कामामध्ये Low Priority दर्शविण्यात आलेले आहे. सबब सदर कामास आराखड्यात दर्शविलेल्या प्राथम्यक्रमानुसारर व प्राप्त निधीनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे विचाराधीन आहे.

(७) विलंब झालेला नाही.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या हद्दीत नवीन गावांचा समावेश करणेबाबत

**(१७) २०३४९ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी- चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेने शासनाकडे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या गावांचा पिंपरी चिंचवड शहरात समावेश करणेबाबत प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिंचवड लोकप्रतिनिधी यांनी सदर प्रस्ताव मंजूर होणेबाबत दिनांक ०४ मार्च, २०२० रोजी वा त्या सुमारास मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत सदर गावांचा समावेश करणेबाबत विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत नवीन गावांचा समावेश करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१०-२०२१) :** (१) दि. ०५/०४/२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ११ गावे समावेशनाबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दि. १५/१०/२०२० च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत, हे खरे आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरण शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

## राज्यातील प्राचार्य भरती प्रक्रियेबाबत.

**(१८) २०३६१ (०७-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विद्यापीठांशी सलग्न असलेल्या सुमारे ४०० महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य पद रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास राज्य शासनाने आरोग्य विभाग व्यतिरिक्त इतर सर्व विभागातील भरती प्रक्रियेला बंदी घातली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण संस्थांनी प्राचार्य पद भरतीकरिता सर्व प्रक्रिया पूर्ण केलेल्या असून केवळ मुलाखतीकरिता शासन प्रतिनिधी न मिळाल्याने प्राचार्य पद भरती प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महाविद्यालयांचे मोठ्या प्रमाणात अनुदानही थकले असून याचा परिणाम शैक्षणिक दर्जावर होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेली प्राचार्यांची पदे तातडीने भरण्यासाठी तसेच थकलेले अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०१-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत वित्त विभागाच्या दिनांक ४ /५/२०२० च्या आदेशान्वये आर्थिक निर्बंध जारी करण्यात आलेले आहेत. यानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व ऑषधी द्रव्ये विभाग वगळता अन्य विभागाकडील दिनांक ४/५/२०२० नंतरची पदभरतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही
(४) हे खरे नाही.
(५) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन परिपत्राक, दिनांक २३/३/२०२१ नुसार महाविद्यालयांतील दैनंदिन प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाच्यादृष्टीने तसेच राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती (NAAC) मिळण्याकरीता दिनांक ३/५/२०२० रोजी रिक्त असलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य संवर्गातील पदभरतीस मान्यता देण्यात आलेली आहे
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत.**

**(१९) २७१०८ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळणारी आरोग्य सेवा अतिशय सुमार दर्जाची आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे नागरिकांना अनेक वेळा खाजगी डॉक्टरांकडे जाऊन उपचार घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोपरगाव येथील ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन याठिकाणी शंभर (बेडचे) खाटांचे रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१५-११-२०२१) :** (१) आणि (२) नाही, हे खरे नाही.
(३) शासन निर्णय दि. २८ जून, २०२१ अन्वये कोपरगाव, जि.अहमदनगर येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णायाचे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाने कंत्राटदारास १६ कोटी रकमेचे देयके अदा करण्याचा प्रस्ताव दाखल करून केलेला गैरप्रकार केल्याबाबत**

**(२०) २७१६५ (२०-०३-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाने साफसफाईच्या कामासाठी ३ कोटी रुपयांची मान्यता असतांना १६ कोटी रकमेचे देयके कंत्राटदारास अदा करण्याचा प्रस्ताव दाखल करून गैरप्रकार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात उभारण्यात आलेल्या ५२ कोव्हीड केअर सेंटरची साफसफाई चा ठराव क्र.१३३ ने ३ कोटी ७६ लाख रुपयांची निविदा काढून प्रत्यक्षात कामाची देयके मंजूर करण्यासाठी घनकचरा विभागाने कंत्राटदार कंपनीला अधिकचे १६ कोटी ८० लाख रुपयांचे देयके अदा करण्यासाठी सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१), (२) व (३)

*पुणे शहरातील विविध ठिकाणी १४ कोविड केअर सेंटरच्या साफसफाईसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्या होत्या.

• सदर कामाची निविदा रक्कम रु.३,७८,१४,४००/- एवढी होती.

• या कामाचे कार्यादेश दि.०२/०६/२०२० रोजी मे. दिशा एजन्सी यांना देण्यात आले.

• या कालावधीत पुणे शहरात कोविड -१९ चा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला. कोविड सेंटरची संख्या एप्रिल, २०२० मध्ये १४ एवढी गृहीत धरण्यात आली होती. ती वाढत जावून जून,२०२० मध्ये ६४ इतकी झाली. तसेच जुलै, २०२० पर्यंत त्यात आणखीण वाढ झाली.

• त्यामुळे गृहीत धरण्यात आलेल्या क्षेत्रफळात सुद्धा वाढ झाली.

• त्यानुसार विविध ठिकाणच्या कोविड सेंटरचे क्षेत्रफळ प्रमाणित करण्यात आले.

• त्यामुळे मुळ मंजूर रक्कम रु.३,७८,१४,४००/- एवढी असून वाढीव काम किती झाले याबाबत पडताळणी सुरु असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• वाढीव रक्कमेच्या प्रस्तावाबाबत तपासणी सुरु असून तपास पूर्ण झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील फायर ऑडिट न करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत**

**(२१) २७१७९ (२०-०३-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) श्री. चेतन तुपे, श्री सुनिल टिंगरे, श्री अशोक पवार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा रुग्णालयातील आगीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयाचे नियमित फायर ऑडिट करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी- चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय महानगरपालिकेचे व खाजगी रुग्णालयांची आग प्रतिबंधक यंत्रणांची संपूर्ण तपासणी करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरातील शासकीय, महानगरपालिकेचे व खाजगी रुग्णालयांचे दर सहा महिन्यांनी शासन मान्यताप्राप्त अग्निशमन अभिकरण एजन्सीमार्फत यंत्रणेकडून तपासणी करून त्याचा अहवाल बी फॉर्ममध्ये अग्निशामन विभागाला सादर करावा असा नियम आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरातील ४८४ रुग्णालयांपैकी अनेक रुग्णालये सदर नियमाकडे दुर्लक्ष करून आपला अहवाल महानगरपालिकेकडे सादर करीत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार पिंपरी-चिंचवड शहरातील शासकीय व खाजगी रुग्णालयाचे फायर ऑडिटबाबतचा अहवाल सादर न करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात शहरात अशी भीषण दुर्घटना घडू नये म्हणून सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयांचे फायर ऑडिट करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१), (२), (३) व (४)

*याबाबत वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली होती हे खरे आहे.

• महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार कोणत्याही इमारतीमध्ये किंवा तिच्या भागामध्ये आवश्यक आग प्रतिबंधक उपाययोजना करणे, त्या कार्यान्वित ठेवणे, तसेच परवाणाधारक संस्थेकडील विहित नमुन्यातील प्रमाणपत्र मुख्य अग्निशामक अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे व याची जबाबदारी ही त्या इमारतीचा मालक किंवा तिचा वापर करणारा भोगवटादार यांची आहे.

• पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत महानगरपालिकेच्या रुग्णालयांची तसेच शहरातील १५ मीटरवरील उंच रुग्णालयांच्या इमारतींची महानगरपालिकेकडून तपासणी करणेत आलेली आहे.

• तसेच खाजगी रुग्णालयांची तपासणी लायसन्स प्राप्त अभिकरणाकडून करण्यात येत असल्याचे आयुक्त, पिंपरी -चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

• महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियमातील तरतूदीनुसार प्रत्येक रुग्णालयांनी अग्निशमन यंत्रणा सुव्यवस्थित ठेवण्याबाबत महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून दि.१०/०२/२०२१ रोजी वर्तमान पत्रामध्ये जाहीर नोटीसद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

• पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील १७ खाजगी रुग्णालयांना अंतिम अग्निशामक ना हरकत दाखले देण्यात आलेले असून, १० रुग्णालयांकडून सदर अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वीत असल्याचे बी फॉर्म महानगरपालिकेकडे जमा करण्यात येतात.

(५) जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांनी दि.११/०१/२०२१ च्या पत्रान्वये सर्व रुग्णालयांच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

• महाराष्ट्र अग्निशमन कायदा, २००६ आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००९ नुसार महाराष्ट्र अग्निशमन सेवा नोंदणीकृत केलेल्या अनुज्ञाप्तीधारक अभिकरणामार्फत इमारतींचे अग्निसुरक्षा परिक्षण करुन घेणे आवश्यक आहे.
• त्यानुसार जिल्हाधिकारी, पुणे यांनी शासकीय व खाजगी रुग्णालयांच्या अग्निशमन व विद्युत सेवा परिक्षणामध्ये आढळलेल्या त्रुटी संबंधितांच्या निदर्शनात आणलेल्या आहेत.
• त्यासअनुसरुन आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी दि. २३/०७/२०२१ च्या आदेशान्वये या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत संबंधितांना आदेश दिलेले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(२२) २७१८३ (१६-०४-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर होत असलेल्या आधुनिक शिक्षण पद्धतीतील बदल लक्षात घेऊन प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या एम. एस. बी. टी. इ जागेत टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमी सुरू करण्याची घोषणा सहा वर्षांपूर्वी शासनाच्या वतीने करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टीचर ट्रेनिंग ॲकॅडमीच्या इमारतीचे बांधकाम गत सहा वर्षांपासून प्रलंबित असून माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान सदर टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमी इमारतीच्या निविदा रकमेतून नियमबाह्यरित्या जवळपास ७५ टक्के रक्कम देऊन सुद्धा सदर इमारतीचे बांधकाम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुणे येथील टीचर्स ट्रेनिंग अकॅडमीच्या इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याने प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाकरिता इतरत्र मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे येथील टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमी इमारतीच्या बांधकाम कंत्राटदार आणि बांधकाम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या कामांची चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कंत्राटदार आणि बांधकाम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारकडून वसूल करावा असे आदेश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास तंत्रशिक्षण संचालनालय आणि उच्चशिक्षण संचालनालयातील अधिकाऱ्यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तंत्रशिक्षण संचालनालय आणि उच्चशिक्षण संचालनालयाच्या अधिकाऱ्यांच्या आर्थिक संगनमताने बांधकाम ठेकेदाराला व बांधकाम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराला इमारतीच्या कामापेक्षा जास्त निधीची देयके सादर करण्यात आली आहेत हे खरे आहे काय,

(६) असल्यास, इमारतीचे अपूर्णावस्थेत असलेल्या कामांचे ऑडिट करण्यात आले आहे काय, तसेच इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण न केल्याने सदर ठेकेदार व बांधकाम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराला काळ्या यादीत टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०१-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक १३/९/२०१९ च्या आदेशान्वये विद्यापीठे आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त शिक्षकीय प्रवर्गातील अध्यापकांच्या व्यवसायिक क्षमतेचा प्रशिक्षणाव्दारे नियमीत विकास करण्यासाठी "महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था" (Maharashtra State Faculty Development Academy) स्थापन करण्यात आली आहे. तसेच सदर संस्थेस स्वायत्तता मिळण्याच्यादृष्टीने शासनाच्या दि. २४/२/२०२० च्या आदेशान्वये सदर संस्थेची कंपनी कायदा, २०१३ अन्वये नोदणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

याअनुषंगाने शासनाच्या दि.१/२/२०२० च्या पत्रान्वये उपरोक्त प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित करण्यासाठी विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, पुणे येथील बांधकाम सुरू असलेल्या इमारतीतील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील अद्यायावत सोयींनीयुक्त सुसज्ज जागा उपलब्ध करून देण्याबाबत मंडळास कळविण्यात आले होते.

सद्य:स्थितीत उक्त इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास येत असून अंतर्गत सजावटीचे काम सूरू आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) व (७) सदर इमारतीच्या बांधकामाच्या विलंबाची कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

१) प्रस्तावित जागेवर पूर्वीपासून असलेल्या झाडांच्या कापणीच्या विरोधात मा. उच्च न्यायालयात असलेली याचिका.

२) बांधकामाच्या प्रस्तावित जागेवर जुने इलेक्ट्रीक सबस्टेशनचे काम

३) सदर जागेवर असलेल्या इलेक्ट्रिकल ट्रान्सफॉर्मरच्या स्थलांतरामुळे तसेच पायाभरणी करताना सापडलेला मोठया पाण्याचा स्त्रोत्र यामुळे आवश्यकतेनुसार इमारतीच्या नियोजित वापरात झालेला कालानुरूप बदल.

४) मार्च, २०२० मध्ये कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे लागू करण्यात आलेली टाळेबंदी.

---

## पुणे येथील फुरसुंगी-देवाची उरुळी कचरा डेपोमध्ये कॅपिंग आणि लॅन्डफिलच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याबाबत

**(२३) २७१८७ (१२-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील फुरसुंगी-देवाची उरुळी कचरा डेपोमध्ये सन २०१७-२०२१ या कालावधीत कॅपिंग आणि लॅन्डफिलच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॅपिंग आणि लॅन्डफिलच्या कामासाठी गत काही वर्षात मशीन भाडेतत्वावर घेऊन कंत्राटदाराला सुमारे ८ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम भाडे म्हणून अदा करण्यात आले असून भाड्यापोटी अदा केलेल्या रकमेत दोन नवीन मशीन खरेदी झाल्या असत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामासाठी संबंधित कंत्राटदाराकडून वापरण्यात आलेली मशीनरी ही ३० वर्षापेक्षा अधिक जुनी असून, प्रशासनाने मशीनची तांत्रिक क्षमता न तपासता कालबाह्य मशिनच्या सहाय्याने काम करून घेतल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारावर व दोषी आढळणाऱ्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१), (२), (३) व (४) * देवाची उरुळी/फुरसुंगी येथील कचरा डेपोमध्ये सन २०१४ पासून सुमारे ८०० ते ९५० मे. टन इतका कचरा भूभरावात घेण्यात येत होता.

• कचऱ्याचे लेव्हलींग, मातीचे आवरण या कामासाठी चेनबुलडोझरची आवश्यकता असल्याने सन २०१४-२०२० या कालावधीत पुणे महानगरपालिकेने चेनबुलडोझर मार्फत सदर काम करुन घेतले आहे.

• या कामासाठी रु.१४७५/- प्रती तास या दराने सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात तांत्रिक समिती, पुणे महानगरपालिकेची मान्यता घेण्यात आली असून सन २०१४ पासून आतापर्यंत एकूण ०९ निविदा राबविण्यात आल्या आहेत.

• तसेच मशीनच्या भाड्यापोटी रु.०५.१९ कोटी एवढी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

• सदरचे प्रती ताशी दर हे शासनाच्या व इतर शासकीय आस्थापनांच्या तुलनेत कमी असून मान्य दरानुसार व प्रत्यक्षात झालेल्या कामानुसार अदा करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• पुणे महानगरपालिकेमार्फत चेनबुलडोझर मशीन विकत घेण्यासाठी सन २०१५ मध्ये कोटेशन मागविले असता सदर मशीनची किंमत रु.१.०७ कोटी होती. सद्यस्थितीत सदर मशीनची किंमत रु.१.७१ कोटी एवढी असून मशीनच्या देखभाल दुरुस्तीसाठी कुशल मनुष्यबळाचा अभाव, मशीनचे स्पेअर पार्टस् व इतर तांत्रिक अडचणी या पार्श्वभूमीवर मशीन खरेदी करण्यात आले नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग (प्राथमिक) कार्यालयाकडून सेवानिवृत्त झालेल्यांनाही वेतन अदा केल्याबाबत

**(२४) २७२९७ (१२-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) श्री लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग (प्राथमिक) कार्यालयाकडून १८ मुख्याध्यापक, वरिष्ठ लिपिक व शिपाई हे सेवानिवृत्त झाले असतांनादेखील माहे डिसेंबर, २०१९ ते जून, २०२० या कालावधीपर्यंत त्यांना वेतन अदा केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी महानगरपालिका सेवा विनियम, वर्तणूक नियमन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका ठराव क्र.१/४७०, दिनांक ३०/१२/२०२० रोजीच्या पत्रामधून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) * एकूण १८ कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतर जादा वेतन अदा झाल्याचे निदर्शनात आले आहे.
• त्यानंतर डिसेंबर, २०१९ व जून, २०२० मध्ये संबंधित कर्मचाऱ्यांनी जादा वेतनाच्या रक्कमेचा भरणा महानगरपालिकेत केलेला आहे.
• शिक्षण विभाग (प्राथमिक), पुणे महानगरपालिका येथील एकूण १४ क्षेत्रिय कार्यालय व शिक्षण विभाग अशा एकूण १५ कार्यालयांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बिले दरमहा तयार करण्यात येतात.
• नियमित काम करणारे लिपिक कोरोना डयुटीवर असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून अनवधानाने व कार्यबाहुल्यामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची नावे वेतन प्रणालीमधून वगळण्याचे राहून गेले. सदरची तांत्रिक चूक लक्षात आल्यानंतर तातडीने सर्वांकडून रक्कमेचा भरणा करण्यात आला, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
• या प्रकरणी चौकशी करुन ९ संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदीस अनुसरुन भविष्यातील वेतनवाढीवर कोणताही परिणाम होणार नाही, त्यानुसार एक वेतनवाढ रोखण्याची शास्ती लादण्यात आली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात व्याघ्र प्रकल्प परिक्षेत्रात वाघांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(२५) २७४६८ (१२-०६-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहे जानेवारी २०२१ ते मे २०२१ मध्ये वा त्यादरम्यानच्या काळात देशात झालेल्या एकूण वाघांच्या मृत्युंपैकी जवळपास ६०% हून अधिक मृत्यु महाराष्ट्रात झाले असल्याचे निदर्शनास आले असून मृत्यु झालेल्या वाघांपैकी निम्माहून अधिक वाघांचे मृत्यु हे शिकारी व तत्सम गुन्हे या कारणांनी झाले असल्याचे तसेच काही घटनांमध्ये वाघांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच भंडारा वन परिक्षेत्रातील कक्ष क्. १७८ मध्ये एकाच दिवशी वाघांचे तीन बछडे दिनांक १२ मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास मृतावस्थेत आढळून आले असून पांढरकवडा (जि.यवतमाळ) पेंच व्याघ् प्रकल्पांतर्गत नागवाडी परिक्षेत्रासह मुकुटवन येथे गर्भवती वाघिणीची हत्या झाल्याने तसेच अन्य ठिकाणी माहे मार्च, एप्रिल वा त्या दरम्यान १४ वाघ मृतावस्थेत आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत पाच महिन्यांत २० हून अधिक वाघांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले असून वाघाचे एवढया मोठया प्रमाणात मृत्यु होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, कैंद्रीय वन्यजीव गुन्हे शाखेच्या शिफारशीनुसार राज्यात, राज्य वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा स्थापेबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शिकारीसाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने अशा प्रकरणात सायबर डाटा, न्यायालयीन घटनांचा पाठपुरावा करण्यात वनविभागाची यंत्रणा अपुरी पडू नये व आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना आधुनिक प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०१-११-२०२१) :** (१) माहे जानेवारी, २०२१ ते माहे मे, २०२१ याकालावधीत शिकार / विद्युतप्रवाहमूळे-७, रेल्वे अपघातात-१ व नैसर्गिक कारणामुळे-१२ असे एकूण २० (वयस्क व बछडे) वाघांचा मृत्यु झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहे.

शिकार / विद्युतप्रवाहमुळे मृत ७ व्याघांच्या प्रकरणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

• उमरेड पवनी कऱ्हांडला अभयारण्यात वाघांच्या हल्ल्यात कालवडीचा मृत्यु झाला होता. सदर कालवडीच्या माकाने विषप्रयोग केल्याने १ वाघीण व ४ वाघांचा मृत्यु झाला आहे. प्रस्तुत प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली आहे.

• पांढरकवडा वनविभागातील मुकुटबन वनपरिक्षेत्रातील मांगुर्ला नियतक्षेत्रात एका वाघीणीस भाला भोसकून जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक २५.०४.२०२१ रोजी निदर्शनास आली आहे. प्रस्तृत प्रकरणी ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

• पांढरकवडा वनविभागाअंतर्गत मारेगाव वनक्षेत्र खंडणी वर्तुळ वाढोणा नियतक्षेत्रात खाजगी क्षेत्र मौजा आसनगाव (उजाड) शिवारातील नल्यामध्ये ताराचा फास लागुन दिनांक२३.३.२०२१ रोजी एक वाघाचा मृत्य झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. प्रस्तृत प्रकरणी ३ अरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) दिनांक ११.०५.२०२१ रोजी रात्री अवकाळी पाऊस व गारपीठीमुळे जंगलातील वाहून येणारे पाणी टेकेपार उपसा सिंचन प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या सायफन विहिरीत घुसल्याने २ बछड्यांचा पाण्यात बुडून मृत्यु झाल्याची घटना दिनांक १२.०५.२०२१ रोजी निदर्शनास आली आहे. सदर दोन्ही बछड्यांचा मृत्यु Asphysia मुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच दिनांक १२.०५.२०२१ रोजी पवनी वनपरिक्षेत्रातील गुडेगांव नियतक्षेत्रात वाघीणीपासून दुरावल्याने अशक्तपणा येऊन एका बछड्याचा मृत्यु झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. सदर बछड्याचा मृत्यु Dehydration व Starvation मुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमुद करण्यात आले आहे.

एफ.डी.सी.एम. वन प्रकल्प विभागातील रिसाळा सिरोजो उपवनक्षेत्र, वारपाणी बिट येथे

दिनांक २३.०३.२०२१ एक वाघ मृत झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

पांढरकवडा वनविभागातील मुकुटबन वनपरिक्षेत्रातील मांगुर्ला नियतक्षेत्रात एका गर्भवती वाघीणीस भाला भोसकून जाळण्याची घटना दिनांक २५.०४.२०२१ रोजी निदर्शनास आली आहे.

राज्यात दिनांक ०१.०३.२०२१ ते दिनांक ३०.०४.२०२१ या कालावधीत एकूण ९ (६ प्रौढ, ३ बछडे) वाघांचा मृत्यु झाला आहे.

(३) माहे जानेवारी, २०२१ ते माहे मे, २०२१ याकालावधीत विविध कारणामुळे जसे की शिकार / विद्युतप्रवाहमूळे-७, रेल्वे अपघातात-१ व नैसर्गिक कारणामुळे-१२ असे एकूण २० (वयस्क व बछडे) वाघांचा मृत्यु झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहे.

(४) राज्यात वन्यजीव गुन्हे शाखेची स्थापना करण्यात आली आहे.

(५) मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सायबर सेल तयार करण्यात आला असून राज्यात शिकारीच्या घटना घडल्यास सायबर डाटाच्या (कक्षाच्या) मदतीने आरोपींचा शोध घेण्यात येतो. तसेच जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते. अवैध शिकारीचे व इतर गुन्हे शोधणे व पुढील कार्यवाही करण्याकरिता आवश्यकते नुसार पोलस विभागाची मदत घेण्यात येते व प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात येते. या अनुषंगाने वनअधिकारी / कर्मचाऱ्यांना वेळोवेळी कायदेविषयक उजळणी प्रशिक्षण देण्यात येते.

व्याघ्र व इतर वन्यप्राण्यांच्या शिकारीवर आळा घालण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

• वन्यप्राण्यांचा मागोवा घेणे, कॅमेरा ट्रॅप लावणे.
• STPF पथकाद्वारे गस्त करणे, पावसाळ्यात विशेष गस्त करणे.
• गुप्त सेवा निधी उपलब्ध करुन देणे
• M-Stripes प्रणालीद्वारे वन्यप्राण्यांच्या गतिविधीवर लक्ष ठेवणे.
• विद्युत ट्रिपिंग वर लक्ष ठेवणे.
• पाणस्थळाची तपासणी करणे.
• संरक्षित कुटीतील वनमजुरांद्वारे वन्यप्राण्यांवर लक्ष ठेवणे.
• जंगलालगत विहिरीला कठडे बांधणे.
• जंगलात येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींची नोंद घेण्याकरीता मुसाफिर रजिस्टर ठेवणे, मुसाफिर लोकांचे डेरे तपासणे.
• वनातील / वनाशेजारी गावात जनजागृती करणे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वाकोला नदी (मोठा नाला) लगतच्या मुंबई एअरपोर्टपासून टिचर कॉलनी बांद्रापर्यतच्या झोपडयांचे स्थलांतरण करुन संरक्षण भिंत बांधण्याबाबत**

**(२६) २७५९५ (१२-०६-२०२१). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाकोला नदी (मोठा नाला) लगतच्या मुंबई विमानतळापासून टिचर कॉलनी वांद्रेपर्यंतच्या झोपडयांचे स्थलांतरण करुन संरक्षण भिंत बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त, अतिरिक्त महापालिका आयुक्त, सहायक आयुक्त, आदिंकडे दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास सातत्याने पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात साचलेले पाणी घरात शिरुन घरांचे बांधकाम कोसळत असून, वाकोला नदीलगत असलेली एक दुमजली इमारत थेट नाल्यात कोसळून १ महिला व तीच्या २ मुली दिनांक ४ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास मुसळधार पावसात वाहून गेल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, याकरीता लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर ठिकाणी वाकोला नदीच्या संरक्षक भिंतीसह रुंदीकरण करण्यासंबंधीचे काम हाती घेण्यात आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नवीन पुर्नविकसित इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(२७) २७६०७ (१५-०६-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाची सन १९३३ या कालावधीत बांधण्यात आलेली इमारत अत्यंत जीर्ण झाल्यामुळे त्याजागी पुर्नविकास करुन प्रथम नियोजनानुसार सात मजल्यांची तर नवा डीसी रुल आल्यामुळे आता १० मजल्यांचे रुग्णालय बांधण्यात येणार असल्याचे दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा सामान्य रुग्णालयांसाठी रुपये ४८९ कोटी इतका खर्च अपेक्षित असून त्याद्वारे ५७४ बेडस् व इतर सुपर स्पेशालिटी इत्यादि व्यवस्था रुग्णांना उपलब्ध होणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालय तातडीने उभारण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक २२.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये, जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे ३२६ खाटांची वाढ करुन ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय, २०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय व २०० खाटांचे संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी) यामध्ये श्रेणीवर्धन करण्यास " विशेष बाब" म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे . जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे ९०० खाटांचे जिल्हा रुग्णालय, परिचारिका प्रशिक्षण केंद्र व वस्तीगृह बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडा सुधारीत प्रशासकीय मान्यतेकरीता शासनास प्राप्त झाला असून, सदर अंदाजपत्रक व आराखडा तांत्रिक मान्यतेकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेमार्फत बालवाडी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता थेट पध्दतीने शालेय साहित्याच्या खरेदीची प्रक्रीया रद्द करण्याबाबत**

**(२८) २७६१४ (१२-०६-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्यावतीने बालवाडी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता शालेय प्रयोग वही, चित्रकला वही, भूगोल नकाशे आणि विविध अभ्यास पूर्ण पुस्तके नियमबाह्यरित्या थेट पद्धतीने खरेदी करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या शालेय विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य गत वर्षीच्या पुरवठादारांकडून गत वर्षीच्या दराने खरेदी करण्याची शिफारस आयुक्त व प्रशासन यांनी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास नव्याने निविदा वर कार्यवाही न करण्याबाबत आदेश दिले असतानाही पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने कोट्यवधी रुपयांचे शालेय साहित्य शैक्षणिक गुणवत्ता विकास या नावाखाली नियमबाह्यरित्या थेट पद्धतीने खरेदी केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, थेट पद्धतीने कोट्यवधी रुपयांचे शालेय साहित्य खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने थेट पद्धतीने शालेय साहित्याची खरेदी प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१), (२), (३),(४) व (५) * शालेय विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक वर्ष सन २०२०-२०२१ साठी प्रयोग वही, चित्रकला वही, भूगोल नकाशा वही आणि विविध अभ्यासपूरक पुस्तके खरेदी करण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया प्रस्तावित करण्यात आली होती.

• तथापि, कोविड-१९ साथ रोगामुळे निविदा कार्यवाही होऊ शकली नाही.

• परंतु ऑनलाईन शिक्षण सुरु झाल्याने व निविदा प्रक्रियेस होणारे विलंब लक्षात घेवून उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार या साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे.

• साथ रोगाची परिस्थिती, निविदा प्रक्रियेला लागणारा विलंब व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये या दृष्टीकोनातून मागील पुरवठा धारकाकडून मागील मंजूर निविदा दराने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली असल्याचे, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

• मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील न्यायप्रविष्ट प्रकरणातील अंतरीम निर्णयामध्ये नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यास मनाई केली होती.

• याबाबत कायदा विभागाची तसेच ज्येष्ठ विधिज्ञ, मा. उच्च न्यायालय यांचे अभिप्राय घेवून गत पुरवठा धारकाकडून सदरचे साहित्य खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली असून मागील निविदा दराने साहित्य खरेदी केल्यामुळे महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसल्याचे आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरळी, ना.म. जोशी, डिलाईल रोड, शिवडी आणि नायगांव**
**येथील बी.डी.डी चाळींच्या पुनर्विकासाबाबत**

**(२९) २७६७४ (१३-०६-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : तारांकित प्रश्न क्रमांक २०८६४ ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील बीडीडी चाळ प्रकल्पात गेल्या अडीच वर्षात प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नसतानाही टाटा कॅपॅसिट कन्स्ट्रक्शन कंपनीने आराखड्यासाठी २७६ कोटीचे सादर केलेले देयक अदा करण्यासाठी, निवेदनातील अटींचा भंग करून म्हाडावर दबाव आणला जात आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वरळी, ना.म.जोशी मार्ग, डिलाईल रोड, शिवडीआणि नायगाव येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी म्हाडाने अनुक्रमे टाटा कंट्रक्शन कंपनी, शापूरजी पालनजी आणि एल ॲण्ड टी या बड्या कंत्राटदाराची नियुक्ती केली, मात्र या प्रकल्पाला आज चार वर्षे पूर्ण होत असूनही प्रकल्पाचे काम सुरू होऊ शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळीतील प्रकल्पाला अडीच वर्षे झाली असून या काळात संक्रमण शिबिराचे बांधकाम सुरू करण्यात आले, तथापि वरळी येथील आराखड्यात विद्यमान शासनाने बदल सुचविल्यामुळे संक्रमण शिबिराचे कामही रखडलेले आहे. इतकेच नव्हे तर, नव्या बदलानुसार संक्रमण शिबिर रद्द करण्यात आले असून पुनर्वसनाच्या इमारतीचे बांधकाम सुरू केले जाणार

आहे, त्यामुळे संक्रमण शिबिराचे काम जेथे सुरू होते, तेथेच पुनर्वसनाच्या इमारतीचे बांधकाम सुरू केले जाणार होते, परंतु या भूखंडावर आरक्षण आहे. त्यामुळे ते आरक्षण स्थलांतरित केल्याशिवाय बांधकाम सुरू करता येणे शक्य नाही, हे लक्षात आल्यानंतर कथित भूमिपूजन सोहळाही पुढे ढकलण्यात आला, हे ही खरे आहे काय?

(४) असल्यास, आराखड्यातील नव्या बदलानुसार पुनर्वसनाच्या ४० मजली इमारती बांधण्यात येणार असून तळघरातील वाहनतळाऐवजी आता वाहनतळासाठी स्वतंत्र इमारत उभारली जाणार आहे, त्यामुळे आता हे बांधकाम ठप्प झाले आहे, तसेच ना.म.जोशी मार्ग २७५ रहिवासी तेथे बांधलेल्या संक्रमण शिबिरात कधी स्थलांतरित होतो याच्या प्रतीक्षेत आहेत, तर नायगाव येथे गेल्या चार वर्षात रहिवाशांच्या अंतर्गत विरोधामुळे काहीही होऊ शकले नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, निविदेतील तरतुदीनुसार पुनर्वसनाच्या इमारतींच्या पायाचे काम झाल्यानंतरच कंत्राटाच्या एकूण रकमेच्या ५% देयक अदा करण्यात यावे, असे स्पष्ट म्हटले आहे, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, या बीडीडी चाळींच्या पुनर्वसनाच्या कामात सध्या निर्माण झालेल्या सर्व अडचणींचे विनाविलंब निराकरण करून या पुनर्वसनाचे काम शीघ्रगतीने पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२२-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) वरळी येथील २ इमारतींच्या २७५ Pile Foundation चे काम पूर्ण झाले आहे.

(३) नव्या बदलानुसार संक्रमण शिबिर रद्द करण्यात आले आहे आणि त्या जागी एक पुनर्वसन व एक विक्रीयोग्य इमारत बांधणे प्रस्तावित असून सुधारित प्रस्तावास विविध मंजूऱ्या प्राप्त करण्याचे काम सुरु आहे. सदर मंजुऱ्या प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु करण्यात येणार आहे.

(४) वरळी येथील सुधारित आराखड्यात पुनर्वसनाच्या ४० मजली इमारती प्रस्तावित असून सदर इमारतीच्या पोडियममध्ये वाहन तळाची व्यवस्था करण्यात आली आहे. पुनर्वसन इमारत क्र. १ ला विशेष नियोजन प्रा./ म्हाडा यांच्याकडून आय.ओ. ए. (IOA) प्राप्त झाली आहे. इतर परवानग्या प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे.

ना. म. जोशी मार्ग येथील पहिल्या टप्प्यातील अंतर्भूत १० चाळींतील ८०० गाळेधारकांपैकी ६५० गाळेधारक आजतागायत पात्र झालेले आहेत. पात्र गाळेधारकांपैकी २७७ गाळेधारक संक्रमण शिबीरांमध्ये स्थलांतरीत झाले आहेत व त्यापैकी २७२ गाळेधारकांची पुनर्वसन इमारतीमधील गाळ्यांची निश्चिती करण्यात आलेली आहे.

नायगांव येथील ५ चाळींचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून त्यांची प्रारुप पात्रता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(५) हे खरे आहे.

(६) व (७) बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम शीघ्र गतीने पूर्ण होण्यासाठी चालू वर्षी शासन स्तरावरून पुढील कार्यवाही केली आहे:-

(I) बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठी दि. ०९.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचना जारी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार भाडेदारी हस्तांतरण (विक्री) केलेली दि.०१.०१.२०२१ पर्यंतची प्रकरणे ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

(II) लाभार्थीसोबत पुनर्वसन गाळ्याचा करारनामा करण्यास म्हाडास दि. २९.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकृत करण्यात आले आहे.

(III) बीडीडी चाळींतील भाडेकरुंना संक्रमण गाळे उपलब्ध नसल्यास प्रती महिना भाडे देण्याबाबत म्हाडास दि.१३.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

(IV) बीडीडी चाळीमधील गाळे सन १९९६ रोजी अस्तित्वात असल्याचा पुरावा आता गाळेधारकांनी देण्याऐवजी संचालक, बीडीडी यांनी प्रमाणित करण्याच्या सूचना दि.१०.०८.२०२१ रोजी देण्यात आल्या आहेत.

(V) सदरहू चाळींतील लाभार्थी व म्हाडा यांच्यामध्ये होणा-या पुनर्वसन गाळ्यांच्या करारनाम्याकरीता नाममात्र रू.१०००/- मुद्रांक शुल्क आकारण्याचा निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि.१८.०८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

---

**वालूर येथील (जि.परभणी) एचपी गॅस एजन्सी ते झिरो फाटा पर्यंतच्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत.**

**(३०) २७७९६ (१२-०६-२०२१). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) वालूर (जि.परभणी) येथील एचपी गॅस एजन्सी ते झिरो फाटा पर्यंतच्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे मजबुतीकरणासाठी मेटलमध्ये सिमेंटचा वापरच नसून क्रेशरमशीन मधील दगडाचा बारीक चुरा ज्याला कच्छ म्हणतात ते वापरण्यात आले असून, रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी वाहतुकीसाठी पर्यायी रस्त्याच काढण्यात आला नसल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करुन रस्त्यांचे काम दर्जेदार होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२०-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व राज्य दरसूचीतील तरतुदीनुसार प्रश्नाधीन रस्त्याच्या कामात नैसर्गिक वाळुऐवजी कृत्रिम वाळूचा वापर करण्यात येत आहे. सद्यस्थितीत रस्त्याच्या एकूण रूंदीपैकी अर्ध्या रूंदीत काम करण्यात येत असल्याने व अर्धा रस्ता वाहतुकीस खुला असल्याने पर्यायी रस्ता काढण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिंबीसार नगर (गोरेगाव, मुंबई) येथील म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील इमारतींचा पुनर्विकास करणेबाबत**

**(३१) २८०६३ (१८-०६-२०२१). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या ५६ वसाहतीपैकी सर्व्हे क्रमांक ब.न.भू.क्र.२५८ (पै) येथे सन २००१ या कालावधीत म्हाडाने योजना राबवून सदर योजनेत विविध उत्पन्न

गटासाठी बांधलेल्या ३१ इमारतींपैकी इमारत क्रमांक १ ते १७ मध्ये १८० चौ.फु. च्या १ हजार सदनिका संक्रमण शिबिरासाठी बांधल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतींचे बांधकामास जवळपास ३० वर्षांचा कालावधी झालेला असून इमारतींच्या देखभाल व दुरूस्तीकरिता म्हाडाच्या दुरूस्ती मंडळाकडून दरवर्षी लाखो रूपयांचा खर्च करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही या इमारतींची सद्य:स्थितीत मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली असून या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्या जिवीताचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू इमारतींच्या पुनर्विकासाकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे अनेकवेळा पत्रव्यवहार केलेला असूनही अद्यापही या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू इमारतींच्या पुनर्विकासाचे धोरण राबविल्यास त्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना त्यांच्या हक्काची सदनिका उपलब्ध होणार असल्याने या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे व सदरहु इमारतींचा पुनर्विकासाचे काम किती कालावधीत सुरू करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०८-११-२०२१) :** (१) प्रश्नाधिन भुखंडावर इमारत क्र.१ ते १७ मध्ये संक्रमण शिबीरासाठी एकूण ९४० गाळे आहेत.

(२), (३) व (४) कार्यकारी अभियंता /ग-दक्षिण विभाग, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडून सदर संक्रमण शिबीरातील गाळ्यांची दैनंदिन साफसफाई,पावसाळा पुर्व व नंतर ची अत्यावश्यक कामे जसे पाण्याच्या टाक्यांची साफसफई,मल:निसारण वाहिन्यांची दुरुस्ती व देखभाल केली जाते. तसेच, रहिवाशांच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने घरातील दुरूस्तीची कामे करण्यात येतात.

सद्य:स्थितीत सदर संक्रमण शिबीरातील भाडेकरू/रहिवाश्यांकडून कोणतीही गंभीर स्वरूपाची तक्रार म्हाडास प्राप्त नाही असे म्हाडाने कळविले.

(५) शासनाने मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळच्या संक्रमण शिबीरात राहणाऱ्या अधिकृत, अपात्र, अनधिकृत भाडेकरू/रहिवाशी यांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याकरिता दि.१३.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणानुसार बिंबीसार नगर येथील संक्रमण शिबीराचा पुनर्विकास मुंबई मंडळातर्फे करण्याची बाब विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात उपजिल्हा रुग्णालयाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) २९७३५ (१५-०६-२०२१). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व.इंदिरा गांधी स्मृती हे या शहरातील एकमेव उपजिल्हा दर्जाचे रुग्णालय असुनही येथे अद्याप उपजिल्हा रुग्णालयाच्या सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयास उपजिल्हा व मल्टी स्पेशालिटी रुग्णालयाच्या सुविधा उपलब्ध करणे, मंजूर पदांपैकी रिक्त पदे भरणे तसेच कॉलेज ऑफ फिजीशीयन्स अँड सर्जन्स यांच्यामार्फत वैद्यकीय शिक्षण विषयक निरनिराळे डिप्लोमा कोर्सेस सुरू करण्याबाबत लोकप्रतिनीधी यांनी दिनांक १४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य तसेच दिनांक २७ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि रजिस्ट्रार, कॉलेज ऑफ फिजीशीयन्स अँड सर्जन्स, परेल यांस लेखी निवेदन दिले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निषपन्न झाले

(४) असल्यास, त्यानुसार स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात उपजिल्हा रुग्णालयाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय हे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय असून या रुग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांची संख्या जिल्हा रुग्णालया एवढी आहे. उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रमाणकानुसार सदर रुग्णालयात सुविधा उपलब्ध आहेत.

(२) व (३) याबाबतची मा.लोकप्रतिनिधींची निवेदने प्राप्त झाली आहेत. उपजिल्हा रुग्णालय भिवंडी येथील एकूण मंजूर ९४ पदांपैकी ७९ पदे भरलेली आहेत. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

कॉलेज ऑफ फिजीशियन्स अँड सर्जन, मुंबई यांचे नॉर्मस् नुसार कुठल्याही संस्थेमध्ये प्रति विषय २ प्राध्यापकांची गरज असते. यामध्ये मुख्य प्राध्यापक यांना पदव्युत्तर पदवी नंतरचा ६ वर्षांचा अनुभव, तर सहायक प्राध्यापक यांना पदव्युत्तर पदवी नंतर ४ वर्षांचा अनुभव असणे गरजेचे आहे. त्यानुसार सद्यस्थितीत सदरील रुग्णालयात सेवांतर्गत विशेषज्ञ उपलब्ध नसून भिवंडी शहरातील खाजगी प्राध्यापकांनी सदरील बाबत असमर्थता दर्शविली असल्याने कॉलेज ऑफ फिजीशियन्स अँड सर्जनचे अभ्यासक्रम उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे सद्यस्थितीत सुरु करणे शक्य नाही.

(४) व (५) उपजिल्हा रुग्णालय भिवंडी येथे भिषक, बालरोग, अस्थितज्ञ, नेत्रशस्त्रक्रिया, बधिरिकीरण तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ व दंतशल्यचिकित्सक यांच्या नियमित सेवा उपलब्ध असून आयपीएचएस अंतर्गत कान, नाक व घसा तज्ञ यांच्या सेवा कंत्राटी स्वरुपात घेण्यात आल्या आहेत. सदर रुग्णालयात प्रयोगशाळा चाचण्या, सीटीस्कॅन, प्रसुती, क्ष-किरण, शवविच्छेदन इत्यादी सुविधा उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रमाणकानुसार व आयपीएचएस मानकानुसार उपलब्ध आहेत.

---

## मौजे बोरीबेल (ता. दौंड, जि. पुणे) येथील शेतकऱ्यांचे टरबूज व कलिंगडाच्या निकृष्ट दर्जाच्या बियाणांमुळे झालेले नुकसान

**(३३) ३०१३४ (१०-०६-२०२१). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोरीबेल (ता. दौंड, जि. पुणे) येथील नोन यु सीड कंपनीने कुंदन टरबूज वाण व मॅक्स कंपनीने बीएएसएफ (Basf) कलिंगड वाण या निकृष्ट दर्जाच्या बियाणांचा पुरवठा केल्यामुळे शेतकऱ्यांचे तब्बल ७० ते ८० हेक्टर पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक १९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी वा तत्सम यंत्रणेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मौजे बोरीबेल येथील नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. दादाजी भुसे (१२-११-२०२१) :** (१) मौजे. बोरीबेल ता. दौंड येथील शेतकऱ्यांच्या टरबूज व कलिंगड या पिकांचे सुमारे ४१.८० हेक्टर क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) होय,

(३) टरबूज व कलिंगड पिकांच्या वेली व फळे पिवळे पडून सुकून गेल्याबाबतच्या शेतकऱ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तालुका तक्रार निवारण समितीने शास्त्रज्ञांसमवेत दिनांक १७.०५.२०२१ रोजी क्षेत्रीय भेट देवून प्रत्यक्ष पाहणी केली. समितीने टरबूज व कलिंगड पिकांची रोपे विषाणूजन्य रोगास बळी पडत असल्याचे आपल्या अहवालात नमुद केले आहे.

तसेच टरबुज व कलिंगड पिकांचे वेली व फळे यांचे नमुने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ हॉर्टीकल्चर रिसर्च, बेंगलूरु व इंडियन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट, औंध, पुणे या संस्थेकडे विश्लेषणासाठी पाठविण्यात आले होते. सदरील अहवाल प्राप्त झाले असून वाणांचे नमुने विषाणूग्रस्त आढळून आले व त्यांचा प्रसार विविध मावा किडींच्या प्रजातीमार्फत होत असल्याचे निरिक्षण नोंदविले आहे. सदर नुकसानीचा प्रकार हा मशागतीय उणीवामध्ये येत असल्याने बियाणे कायद्याअंतर्गत असणाऱ्या तरतुदीनुसार नुकसान भरपाई देण्यास व कंपनी विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यास पात्र ठरत नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हायब्रीड ॲन्यूइटी या लेखाशिर्षाखाली वितरीत करण्यांत आलेल्या निधीमधून उस्मानाबाद व जळगांव जिल्हयांना वगळल्याबाबत**

**(३४) ३०२४६ (२२-०६-२०२१). डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेल्या रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी सन २०२०-२१ या कालावधीत दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास हायब्रीड ॲन्यूइटी या लेखाशिर्षखाली रु.५५२.९२ कोटी इतका निधी वितरीत करण्यांत आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी वितरीत करतांना उस्मानाबाद जिल्हयास वगळण्यांत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जळगाव जिल्हयासही वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उस्मानाबाद व जळगाव जिल्हयांकरीता रस्त्यांची दुरुस्ती व देखभालीकरीता उपरोक्त लेखाशिर्षातर्गत निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच साधारणत: किती काधावधीत दोन्ही जिल्ह्यांना निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (०९-११-२०२१) :** (१) होय हे अंशत: खरे आहे,

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत हायब्रीड ॲन्युईटी कार्यक्रमांतर्गत ५०५४५२४२ या लेखाशीर्षाखाली सन २०२१-२२ या वर्षात अर्थसंकल्पीत तरतुदीतून दि.०३ मे, २०२१ रोजी एकुण रु.५८७.६९ कोटी इतका निधी हा हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या विविध प्रकल्प/पॅकेजेसकरिता वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) व (३) सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षात उस्मानाबाद जिल्ह्याकरिता अनुक्रमे रु.१३०.९१ कोटी व रु.१०७.८८ कोटी तसेच जळगाव जिल्ह्याकरिता अनुक्रमे रु.२२७.६१ कोटी व रु.१७५.६३ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सन २०२१-२२ या वर्षात कोविड-१९ मुळे महसूलात आलेली घट विचारात घेऊन उपलब्ध निधीच्या प्रमाणात प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांना शासननिर्णय दि.०१/११/२०१८ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार निधी वितरीत केला आहे.

(४) (५) व (६) रस्त्यांचे परिरक्षण व दुरुस्तीकरिता ३०५४-मार्ग व पूल या प्रधानशीर्षांतर्गत तरतुद अर्थसंकल्पीत केली जाते. याखाली सन २०२१-२२ या वर्षासाठी उस्मानाबाद व जळगाव मंडळ कार्यालयांकरिता रस्त्यांच्या परिरक्षण व दुरुस्तीकरिता अनुक्रमे रु.६६.२७ कोटी व रु.३०.६८ कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

तरतुद वितरीत करण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. कोविड-१९ महामारीमुळे महसूलात आलेली वित्तीय घट विचारात घेऊन वित्त विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत निधी वितरीत करण्यात येईल.

---

**पुणे महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता, मल:निस्सारण प्रकल्प अधिकाऱ्याची बनावट स्वाक्षरी करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत**

**(३५) ३०६८० (१८-०६-२०२१). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर पालिकेच्या मल:निस्सारण प्रकल्प विभागात कार्यरत असलेले अधीक्षक अभियंता हे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास महापालिका सेवेतून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांचा कार्यभार विभागातील अन्य अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार म्हणून महापालिकेमार्फत सोपविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्तीच्या तीन महिन्यांनंतर म्हणजे दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास सेवानिवृत्त झालेल्या अधीक्षक अभियंता या अधिकाऱ्याची बनावट स्वाक्षरी करुन पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या ठेकेदाराला ४ कोटी ८८ हजार २४ लाख ५०५ रुपयांचे परस्पर देयक अदा करुन आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदार कंपनीस देण्यात आलेल्या देयकावर आपण स्वाक्षरी केली नसून आपली बनावट स्वाक्षरी करुन देयक अदा करण्यांत आल्याचे सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता (श्री.खांडवे) यांनी प्रसार माध्यमांद्वारे जाहीर केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यांत आली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदार कंपनीस ४ कोटी ८८ हजार २४ लाख ५०५ रुपयांचे देयक अदा करुन संगनमताने आर्थिक गैरव्यवहार करुन महापालिकेचे नुकसान करणाऱ्या सर्व संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशा आशयाचे वृत्त दै.लोकमत या वृत्तपत्रात दिनांक २५.०१.२०२१ रोजी आले होते.
(३) व (४) * पुणे शहरातील मैलापाणी व्यवस्थापनासाठी मैलापाणी गोळा करणाऱ्या वाहिन्या व मुख्य वाहिन्या विकसित करणे या कामाकरीता निविदा क्र.२५६-२०१६ या निविदेचा समावेश करण्यात आला होता.
• सन २०१९-२०२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये विषयांकित कामासाठी एकूण ७ कोटी एवढी तरतूद मंजूर झाली होती. परंतू सदर तरतूद विविध रक्कमांच्या क्षेत्रिय कार्यालयाकडील व मुख्य ड्रेनेज विभागाकडील कामांसाठी दिल्यामुळे सदर कामातील दि.०१.०७.२०१८ ते दि.१५.०१.२०१९ या कालावधीतील बारावे रनींग बील ठेकेदारास अदा करणे शक्य झाले नाही व बील अदा करण्यास विलंब झाला.
• तथापि, सदर रकमेतील उर्वरित अखर्चीत रक्कम रू.५.१६ कोटी या योजनेसाठी नोव्हेंबर, २०१९ नंतर उपलब्ध झाल्यावर सदर रक्कम ठेकेदारास दि.०७.१२.२०१९ या रोजी अदा करण्यात आलेली आहे.
• १२ व्या रनींग बिलाच्या कालावधीत कार्यरत असलेले अधिक्षक अभियंता दि.३१.०८.२०१९ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. तथापि, सदर बीलाच्या कालावधीत सदरहू अधिक्षक अभियंता कार्यरत होते. त्यामुळे त्यांनी या कामाच्या बील फॉर्मवर सही केली होती. तथापि, त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सदरचे बील प्रत्यक्षात दि.०७.१२.२०१९ रोजी अदा करण्यात आले आहे.
• याबाबत प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली असून सदर स्वाक्षरी सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता यांचीच असून ती सेवानिवृत्ती पूर्वीचीच असल्याचे त्यांनी स्वत: स्पष्ट केले आहे, असे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील दीनदयाल अंत्योदय योजना अभियांतर्गत नगरपरिषद, लोहा यांच्यामार्फत बचत गटांना वाटप करण्यात आलेल्या साहित्यात झालेला गैरव्यवहार**

**(३६) ३२२१६ (०१-०९-२०२१). श्री.श्यामसुंदर शिंदे (लोहा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत नगरपरिषद, लोहा व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्यामध्ये दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास बचत गटांना आर्थिक सहाय्य, व्यवसाय प्रशिक्षण, इ. सुविधा पुरविण्याबाबत करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त करारान्वये, बचत गटांना पुरविण्यात आलेल्या मशीन वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत श्री बालाजी महिला बचत गट व इतर बचत गट यांनी सहाय्यक प्रकल्प अधिकारी, नगर परिषद, लोहा, जि. नांदेड यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित सहाय्यक प्रकल्प अधिकारी, नगरपरिषद, लोहा कार्यवाही करत असल्याने त्यांना धमकावणे व मानसिक त्रास देण्याचा प्रकार होत असल्याचे निवेदन त्यांनी आयुक्त, नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्याकडे दिनांक २ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणाऱ्या महिला अधिकाऱ्याला संरक्षण देण्याबाबत तसेच बचत गटांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्य व निधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-१०-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.

आयुक्त तथा राज्य अभियान संचालक, दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान व उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई यांच्यात दि.०६ सप्टेंबर, २०१७ रोजी करार झाला आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि, सदरील मशिन दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजनेअंतर्गत लोहा नगरपरिषदेच्या माध्यमातून वितरीत करण्यात आलेल्या नसून, मानव विकास मिशन योजनेंतर्गत जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्याकडून वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) बचत गटाच्या निवेदनाच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सूचित केल्यानुसार प्रस्तुत प्रकरणी जिल्हा नियोजन अधिकारी, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा मानव विकास समिती, नांदेड यांनी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन पाहणी व तपासणी केली. नगरपरिषद लोहा अंतर्गत पुरविण्यात आलेल्या सर्व मशिन उपलब्ध असून, त्या बचत गटाकडे आढळून आल्या. यामुळे या प्रकरणात गैरव्यवहार व आर्थिक अनियमितता झाली नसल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्याने, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरोधात कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व पत्रकार, कॅमेरामन यांना फ्रन्टलाइन वर्कस घोषित करणेबाबत**

**(३७) ३२२३५ (०२-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वृत्तपत्र पत्रकार, विविध प्रसिद्धी आणि दृक-श्राव्य माध्यमातील पत्रकार, कॅमेरामन कोरोना सदृश्य परिस्थितीत स्वतःचा जीव धोक्यात घालून वृत्तांकन करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात काही पत्रकारांना आपला जीव सुद्धा गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व पत्रकार कॅमेरामन यांना फ्रन्टलाइन वर्कर घोषित करून त्यांना विमा व इतर लाभ देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (२७-१०-२०२१) :** (१) (२) (३) होय

(४) कोरोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य यांचेशी संबंधित कर्तव्य बजावित असताना शासनाच्या विविध विभागातील विविध प्रवर्गातील कर्मचारी यांचा कोरोना विषाणूशी जवळून संबध येतो अशा कर्मचाऱ्यांना रु.५० लक्ष रक्कमेचे सर्वकक्ष वैयक्तिक अपघात कवच पुरविण्याबाबत दि. २९ मे, २०२१ रोजी वित्त विभागामार्फत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. पत्रकार हे शासकीय कर्मचारी नसून त्यांचा कोरोना विषाणूशी जवळून संबंध येत नाही. यास्तव त्यांना फ्रन्टलाईन वर्कर घोषित करुन विमा व इतर लाभ देता येणे शक्य नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोथा (जि.बुलडाणा) घाटातील ज्ञानगंगा अभयारण्यातील बुलढाणा-खामगाव राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपुल बांधण्याबाबत**

**(३८) ३२२६० (०२-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोथा (जि.बुलढाणा) घाटातील ज्ञानगंगा अभयारण्यातून बुलढाणा-खामगाव हा राष्ट्रीय महामार्ग जात असून अपघातात वन्यजीवांचे व वनसंपदेचे रक्षण तसेच मुक्तपणे संचार व्हावा, रस्ता रुंदीकरणात वनविभागाची जमीन जाऊन वृक्षांची हानी टाळणे आणि नागरिकांना पर्यटनाचा आनंद घेता यावा यासाठी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव यांच्या दालनात दिनांक २२ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत समिती नेमून या अभयारण्यातुन उड्डाणपुल बांधण्याची मागणी केंद्राकडे करण्यात यावी असे निश्चित झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने बुलढाणा येथे समिती अध्यक्ष मुख्य वनसंरक्षक क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्रप्रकल्प, श्री एम.एस.रेड्डी यांच्या सोबत झालेल्या बैठकीत सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१७-११-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत खामगाव-बुलढाणा रस्त्यावरील बोथा ते वरवंड या ज्ञानगंगा अभयारण्यातील सुमारे १२.१५० कि. मी. रस्त्यावर उड्डाणपूल बनविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला यांचे मार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्य शासनाचा निधी मिळाला नसल्याने उमेदच्या योजना बंद पडल्याबाबत.**

**(३९) ३२२६२ (०४-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानचा केंद्र सरकारचा निधी मिळाला असून राज्य शासनाचा हिस्सा मिळाला नसल्याने उमेद अंतर्गत राष्ट्रीय आर्थिक परिवर्तन प्रकल्पअंतर्गत सुरू असणारे सर्व प्रकल्प बंद पडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने आपल्या हिश्श्याचा निधी न देण्याची कारणे कोणती,
(३) असल्यास, याबाबत उपक्रमाअंतर्गत सुरू असणारे कोणकोणते उपक्रम निधी अभावी बंद पडले व उमेद अंतर्गत निधी केव्हा मिळणारा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा फुले कर्जमाफी योजनेतील वंचित पात्र कर्जदारांना कर्जमाफीचा लाभ मिळण्याबाबत**

**(४०) ३२३१८ (१२-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कर्ज माफी योजनेची घोषणा होऊन दीड वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन देखील राज्यभरातील अनेक पात्र शेतकरी अजूनही कर्जमाफी पासून वंचित असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निमार्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ न मिळालेल्या नव्याने कर्ज सुद्धा मिळत नसल्याने बँका वसुलीसाठी तगादा लावत असल्याने त्यांना तातडीने कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा अशी मागणी बुलढाणा जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी तहसीलदार , सहा निबंधक , जिल्हा उपनिबंधक , जिल्हाधिकारी यांच्याकडे सातत्यानी करीत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वंचित पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-११-२०२१) :** (१) नाही.
(२) होय.
(३) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील विशीष्ठ क्रमांकासह १.७८ लाख शेतकऱ्यांच्या याद्या आधार प्रमाणीकरणासाठी उपलब्ध असून त्यापैकी १.७४ लाख शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. त्यापैकी १.७१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रु. ११३०.३९ कोटी कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्यात आली असून आधार प्रमाणीकरण झालेल्या शेतकऱ्यांपैकी २७७५ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी -चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या वतीने खाजगी रुग्णालयांना नियमबाह्यरित्या व्हेंटीलेटर उपलब्ध करून देण्यात आलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(४१) ३२३३७ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोरोना विषाणूचा प्रतिबंध करून वाढती रुग्णसंख्या आटोक्यात आणण्याकरिता अनेक उपाययोजना करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम., ऑटो क्लस्टर, वाय.सी.एम., भोसरी रुग्णालय, जिजामाता रुग्णालय, जम्बो कोविड रुग्णालयात अनेक आर्थिक दुर्बल घटकातील गरीब रुग्ण पैशाआभावी महागड्या खाजगी रुग्णालयात औषधोपचार करण्याची परिस्थिती नसल्याने ऑक्सिजन बेड, व्हेंटीलेटर बेड व वैद्यकीय उपाचाराकरिता प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेच्या रुग्णालयातून व्हेंटीलेटर अभावी अनेक नागरिकांनी आपल्या रूग्णाला नाईलाजास्तव आर्थिक भार सोसून खाजगी महागड्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असतांना, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्वत:च्या रुग्णालयातील व्हेंटीलेटरची क्षमता वाढविण्याऐवजी महानगरपालिका क्षेत्रातील १० खाजगी रुग्णालयांना नियमबाह्यरित्या ४८ व्हेंटीलेटर वाटप दिनांक १ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच खाजगी रुग्णालयांना नियमबाह्यरित्या वाटप केलेले सर्व व्हेंटीलेटर महानगरपालिकेच्या वाय.सी.एम., भोसरी रुग्णालय, जिजामाता रुग्णालयात तातडीने वैद्यकीय उपचाराकरिता उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रुग्णालयांना व्हेंटीलेटर वाटप करताना गरीब रुग्णांना सवलत देणेबाबत कोणतेही नियम व अटी न लावल्याने गरीब रुग्णांना सदर खाजगी रुग्णालयात कोणतीही सवलत न मिळता खाजगी रुग्णालयांच्या वाढीव दरानुसार वैद्यकीय देयकाची प्रतिपूर्ती करण्यास भाग पाडल्याचे आढळून आले आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील गोरगरीब रुग्णांना वैद्यकीय उपचाराकरिता व्हेंटीलेटरची नित्यंत गरज असतानाही वैद्यकीय विभागाच्या विशिष्ट अधिकाऱ्याने नियमबाह्यरित्या खाजगी रुग्णालयाशी आर्थिक हितसंबंध जोपासत मनपाकडे असलेले ४८ व्हेंटीलेटर नियमबाह्यरित्या वाटप केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयाकडे व्हेंटीलेटर बेडचा तुटवडा असल्याने खाजगी रुग्णालयांना देण्यात आलेले व्हेंटीलेटर जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) * पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. ऑटोक्लस्टर, भोसरी रुग्णालय, जिजामाता रुग्णालय, जम्बो कोविड रुग्णालयात सर्व कोविड रुग्णांकरिता ऑक्सिजन बेड, व्हेंटिलेटर बेड व वैद्यकिय उपचार उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. ही सर्व रुग्णालये कोविड समर्पित करण्यात आलेली असल्याने सर्व उपचार मोफत देण्यात येत असल्याचे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

• महानगरपालिके मार्फत चालविण्यात येत असलेल्या सर्व रुग्णालयांमधील व्हेंटिलेटर बेड भरलेले असल्याने, तसेच कोविड १९ बाधित रुग्ण संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे विभागीय आयुक्त, पुणे यांचे परवानगीने सीएसआर फंडातून मोफत मिळालेले व्हेंटिलेटर्स जी खाजगी रुग्णालये त्वरीत व्हेंटीलेटर कार्यान्वीत करु शकतील व त्या रुग्णालयाकडे आयसीयू बेडची क्षमता जास्त आहे अशा रुग्णालयांना सदर व्हेंटीलेटर देणेत आले होते.

(४) होय, खरे आहे.

(५) व (६)

• सदर व्हेंटिलेटरवर उपचार केलेल्या रुग्णांना व्हेंटिलेटरचे दर नियमित दराच्या ५०% कमी आकारणे बाबत अट लावण्यात आली होती.

• तसेच त्या कालावधीमध्ये एकूण १०९ रुग्णांनी व्हेंटिलेटरवर उपचार घेतले असून सदर रुग्णांना रु.२१,१८,२८८/- ची सवलत देण्यात आली आहे.

• साथ रोग अधिनियम, १८९७ चे कलम २, ३ व ४ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ व महाराष्ट्र कोविड उपाययोजना २०२० च्या अनुषंगाने व खालील अटी व शर्तीनुसार सदर व्हेंटिलेटर खाजगी रुग्णालयांना वाटप करण्यात आले .

१. सदरचे व्हेंटिलेटर हे कोरोना कालावधी करीता तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

२. देण्यात आलेल्या साहित्याची देखभाल दुरुस्ती ही रुग्णालयाने स्वत: करावयाची आहे.
३. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे वॉर रुममधून आलेल्या रुग्णांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.
४. देण्यात आलेले व्हेंटिलेटर हे सुस्थितीत पुन्हा परत करण्याची जबाबदारी संबंधित रुग्णालयाची राहिल.

• आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी तातडीची बाब असल्याने विभागीय आयुक्त, पुणे यांची लेखी पूर्व परवानगी घेवून त्वरीत अटी शर्तीच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात सदर व्हेंटिलेटर पुरविणेत आले होते.

• तसेच कोविड रुग्णसंख्या कमी झाली असल्याने सर्व खाजगी रुग्णलयांनी दिलेले व्हेंटिलेटर सुस्थितीत परत केलेले आहेत, असे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेतील खाजगी**
**कोविड रुग्णालये नोंदणीशिवाय सुरु केल्याबाबत**

**(४२) ३२३३८ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार कोणत्याही रुग्णालयाला नोंदणी केल्याशिवाय रुग्णांवर उपचार करता येत नसतांना देखील पिंपरी-चिंचवड शहरात मान्यता न घेता सुमारे २८९ रुग्णालये राजरोसपणे सुरु असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार मान्यता संपलेल्या अनेक बड्या खासगी रुग्णालयांचा समावेश असून, सदर रुग्णालयांना कोविड रुग्णालय मान्यता देताना पिंपरी - चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्यावतीने कागदपत्रांची छाननी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविड रुग्णालयाची मान्यता देताना २८९ रुग्णालयाने ही नोंदणी विना सुरू असल्याची बाब आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली नाही तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आर्थिक हितसंबंध साधत कागदपत्रांची पूर्तता नसलेल्या व बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार नोंदणी नसलेल्या रुग्णालयांना कोविड रुग्णालयाची मान्यता दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाच्यावतीने कोरोना बाधितांचे मृत्युचे ऑडिट करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून देखील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने अद्यापही एकाही कोरोना बाधिताच्या मृत्युचे ऑडिट केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रुग्णालयांमधील कोरोनाने मृत्यू झालेल्या रुग्णांच्या मृत्युचे ऑडिट करण्याबाबत तसेच कोरोना बाधितांच्या मृत्यूचे ऑडिट करण्यास दिरंगाई व विलंब लावण्यात आलेल्या अधिकाऱ्यांवर व महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१०-२०२१) :** (१), (२) व (३) राज्यातील कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावामुळे सन एप्रिल २०२१ पासून राज्यात लॉकडाऊन सुरू होता. या कालावधीत काही खाजगी रूग्णालयांचे परवाना नूतनीकरण प्रलंबित असल्याने, तसेच अनेक रूग्णालयांची नोंदणी व नूतनीकरण झालेले नसल्याने सदर रूग्णालय बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली होती.

• कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव विचारात घेता जनतेला वैद्यकीय सेवा मिळण्याची अत्यंत आवश्यकता, तसेच सर्व शासकीय रूग्णालयांसह खाजगी रूग्णालय पूर्ण क्षमतेने चालू असणे आवश्यक होते.

• त्यामुळे ज्या रूग्णालयांची नोंदणी परवाना नूतनीकरण प्रलंबित आहे अशा रूग्णालयांना शासनाच्या कार्योत्तर मंजूरीच्या अधिन राहून प्रथमता दिनांक ३१.०८.२०२१ पर्यंत तत्वत: परवाना ग्राहय असल्याचे गृहीत धरून सदर रूग्णालये सुरू ठेवण्यास व रूग्ण सेवा देण्यास आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र शासन यांनी दि.१८.०५.२०२१ च्या पत्रान्वये अनुमती दिली होती.

• त्यानुसार एकूण १३७ रूग्णालयांना कोविड रूग्णांस उपचार मिळण्यासाठी परवानगी देण्यात आली असून अशी मान्यता देताना शासकीय सर्व नियमांची तसेच बॉम्बे नर्सिंग ॲक्टमधील तरतूदीनुसार अंमलबजावणी करण्यात आलेली असल्याचे, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) व (५) राज्य शासनाच्या आदेशानुसार कोविड मृत्यु अन्वेषण (डेथ ऑडिट) नियमितपणे करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कमिटी स्थापन करण्यात आली असून सदर कमिटीमार्फत ४० वर्षाखालील ७५ कोरोना बाधित रूग्णांच्या मृत्यूचे ऑडिट करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेमार्फत आर्थिक दुर्बल घटकांना अनुदान देण्याबाबत**

**(४३) ३२३४४ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊन-२ कालावधीत पारंपरिक व्यवसाय करून उदरनिर्वाह चालविणाऱ्यां लोकांचे संपूर्ण व्यवसाय उध्वस्त झाले असून त्यांच्यावर आर्थिक संकट ओढावले असल्याने उपासमारीची वेळ आली आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेमार्फत शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांना आर्थिक मदत नागरिकांच्या थेट बँक खात्यात जमा करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे दिनांक १० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या लाभार्थींच्या प्रमाणेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील आर्थिक दुर्बल घटकांना महानगरपालिकेमार्फत तीन हजार रुपये अनुदान देणेबाबतच्या प्रस्तावास पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती व सर्वसाधारणसभेत मंजुरी देण्यात आली असून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांनी अद्यापही आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना अनुदान देण्याऐवजी मार्गदर्शनाकरिता विभागीय आयुक्त, पुणे

यांना माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वनिधीतून आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांच्या थेट बँक खात्यात अनुदान देण्यापासून महानगरपालिका प्रशासन जाणीवपूर्वक वंचित ठेवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्य शासनाने ज्याप्रमाणे लॉकडाऊन काळात आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना थेट बँक खात्यात अनुदान दिले त्याप्रमाणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिके मार्फत शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांना आर्थिक मदत नागरिकांच्या थेट बँक खात्यात जमा करणेबाबत परवानगी व मार्गदर्शन तत्वे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र शासनाने कोरोना काळात ज्या छोट्या व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे अशा घटकांना प्रत्येकी १५००/- चा लाभ देण्याचे जाहिर केले आहे.

• असे असताना त्याच कारणांसाठी रू.३०००/- चे अर्थ सहाय्य पुन्हा एकाच कारणांसाठी दोनदा आर्थिक मदत देण्यासारखे आहे, असे अभिप्राय याप्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे मुख्य या नात्याने दिले आहेत.

• त्यास अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दि.०८.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मुख्य सभा, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे ठराव विखंडनासाठी सादर केले असून त्याबाबत शासन स्तरावर उचित कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी - चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या नागरवस्ती समाज विकास विभागातील पदे भरण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४४) ३२३४६ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी - चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या नागरवस्ती समाज विकास विभागासाठी आवश्यक असणाऱ्या बारा पदांचे शासन मान्यतेसाठी सेवाप्रवेश व सेवा वर्गीकरण नियम २०१६ अन्वये नगरविकास विभागाकडे दिनांक ३० जुलै २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विभागातील मुख्य समाज विकास अधिकारी, समाजसेवक, सहाय्यक अधिकारी अशा बारा नवनिर्मित पदांसाठी मनपाच्या मान्यतेने प्रस्ताव शासनाकडे मंजुरी करता पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील पाच वर्षापासून सदर प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित असल्याने पिंपरी-चिंचवड शहरातील लोकसंख्या आणि क्षेत्रफळचा विचार करता शहरातील मागासवर्गीय महिला, बालके, विद्यार्थी, दिव्यांग व्यक्ती, अनाथ, निराधार, ज्येष्ठ नागरिक अशा वंचित घटकांसाठी विकासात्मक कार्य करणाऱ्या महानगरपालिकेला कुशल मनुष्यबळाअभावी अभावी मोठ्या

प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती समाज विकास विभागातील पदे भरण्याच्या प्रस्तावास तात्काळ मंजुरी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१०-२०२१) :** (१), (२), (३) व (४)
• पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मान्यतेकरीता आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून शासनास दिनांक ३०.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला होता.त्यामध्ये नागरवस्ती विभागातील पदांचा समावेश होता.
• सदर प्रस्तावास अनुसरून तसेच पिंपरी चिंचवड महानगरपलिकेतील संबंधित अधिकाऱ्यांशी विचार विनिमय करून तपासणीअंती दिनांक ३०.०८.२०१९ च्या शासननिर्णयान्वये अत्यावश्यक सेवेतील एकूण ३९३ एवढी नविन पदे मंजूर करण्यात आली होती. या प्रस्तावाच्या वेळी नागर वस्ती विभागातील पदांबाबत विचार झालेला होता. तथापि, मंजूर पदांमध्ये नागर वस्ती विभागातील पदांना मान्यता देण्यात आलेली नाही.
• तसेच आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपलिका यांनी मुख्य समाज विकास अधिकारी अशा अभिनामाचे नविन पद व सदर पदाचे सेवा प्रवेश नियम मंजूरीकरीता शासनाकडे स्वंतत्ररित्या पाठविले होते.
या प्रस्तावास दिनांक २१.०६.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
• पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांमधील मंजूर पदे, प्रस्तावित पदे व विभागांची/पदांची रचना या अनुषंगाने तपासणी करून सुधारित आकृतीबंध मंजूरीसाठी शासनास पाठविण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील ऐतिहासिक किल्ले शिवनेरीवर लागणाऱ्या वणव्याला प्रतिबंध करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४५) ३२३५८ (०२-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील छत्रपती शिवरायांचे जन्मस्थान असलेल्या ऐतिहासिक किल्ले शिवनेरीवर काही समाजकंटकांनी आग लावल्याने मोठ्या प्रमाणावर वनसंपदेचे नुकसान झाल्याची घटना दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किल्ले शिवनेरीवर एकाच वेळी तीन वेगवेगळ्या ठिकाणी आग लागल्याने अनेक वस्तू वनस्पतींसह झाडे जळून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उन्हाळ्यात किल्ले शिवनेरीवर लागणाऱ्या वणव्याला प्रतिबंध करण्यासाठी पंधरा वर्षांपूर्वी वन विभागाने सविस्तर प्रस्ताव तयार करून शासनास मंजुरीकरिता पाठविण्यात आला

होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शिवनेरी गडावरील वणव्याची व आग लागून झालेल्या नुकसानाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किल्ले शिवनेरी वर लागणाऱ्या वणव्याला प्रतिबंध करण्यासाठी वन विभागाने राज्य शासनाकडे पंधरा वर्षापूर्वी पाठवलेला प्रस्ताव तातडीने मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२१-१०-२०२१) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

मात्र दिनांक २६.०३.२०२१ रोजी एकाच ठिकाणी श्री.बुट्टे पाटील यांचे मालकी क्षेत्रात वणवा लागला होता. सदरचा वणवा वनक्षेत्रात येऊन अंदाजे १ हे. पर्यतच्या क्षेत्रावरील वाळलेले गवत, छोटी झुडपे यांचे नुकसान झाले.

(३) हे खरे नाही.

(४) दिनांक २६.०३.२०२१ रोजी किल्ले शिवनेरी येथे वणवा लागला होता. त्याअनुषंगाने जुन्नर वनविभागा कडील रेंज वनगुन्हा क्र. एएफ-५६/२०२०-२१ दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने किल्ले शिवनेरी विकासकामाकरिता एक समिती स्थापन केली असुन सदर समिती शिवनेरी परिसर विकास कार्यक्रमा अंतर्गत सर्व विभागांचा विकास आराखडा तयार करते. तसेच जुन्नर वनविभागामार्फत दरवर्षी किल्ले शिवनेरी येथे वनवणवा व्यवस्थापने करीता जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत दरवर्षी प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतो व त्यानंतर जाळरेषेची कामे करणे, फायर कॅम्प उभारणे, संरक्षक मजूरांमार्फत गस्त घालणे, इ. कामे करुन वनवणव्यावर नियंत्रण आणले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात विशेषतः पिंपरी- चिंचवड (जि.पुणे) शहरात कोरोना काळातील अवास्तव देयकांची रक्कम परत न देणाऱ्या खाजगी रूग्णालयांविरुद्ध कारवाई करणेबाबत

**(४६) ३२३६६ (०१-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः पिंपरी-चिंचवड (जि. पुणे) शहरात कोरोना रुग्णांवर उपचारासाठी परवानगी दिलेल्या खाजगी रुग्णालयांमार्फत अवास्तव देयके आकारले जात असल्याचे माहे मार्च २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी रुग्णालयांमार्फत आकारण्यात येणाऱ्या वैद्यकीय देयकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच देयकासंदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यासाठी, अंतिम लेखापरीक्षणासाठी देयक पडताळणी समितीची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शहरात कोरोनाकाळात रुग्णांकडून आकारण्यात आलेल्या अवास्तव देयकाची रक्कम परत देण्यास नकार देणाऱ्या शहरातील खाजगी रुग्णालयांविरुद्ध पोलिसांकडे गुन्हा नोंदवून संबंधित रुग्णालयांची नोंदणी रद्द करण्याबाबतचे आदेश पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच खाजगी रुग्णालयामार्फत आकारण्यात आलेली अवास्तव देयके सरकारी नियमाप्रमाणे संबंधित पथकाने कमी केल्यानंतर सदर देयके स्वीकारण्यास खाजगी रुग्णालये नकार देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी पिंपरी-चिंचवड शहरातील रुग्णालयांवर गुन्हा नोंदवून रुग्णालयांची नोंदणी रद्द करण्याबाबत तसेच कोरोना काळातील अवास्तव देयकांची रक्कम परत न देणाऱ्या खाजगी रूग्णालयां विरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१०-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दि.३१.०५.२०२१ च्या आदेशान्वये कोविड-१९ अंतर्गत महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील खाजगी रूग्णालयामार्फत आकारण्यात येणाऱ्या वैद्यकीय बिलांच्या पूर्व/अंतिम लेखापरिक्षणाकरिता देयक पडताळणी समितीची स्थापना करण्यात आली आहे हे खरे आहे.

(३), (४) व (५) खाजगी रूग्णालयामार्फत आकारण्यात आलेली आवास्तव देयके सरकारी नियमाप्रमाणे संबंधित यंत्रणेने कमी केल्यानंतर सदर देयके स्विकारण्यास खाजगी रूग्णालये नकार देत असल्याचे निदर्शनास आले आहे.

• पिंपरी चिंचवड शहरात कोरोनाकाळात कोविड रूग्णांकडून आकारण्यात आलेल्या अवास्तव देयकाची रक्कम परत देण्यास नकार देणाऱ्या खाजगी रूग्णालयांस त्यांना देण्यात आलेली कोविडची नोंदणी रद्द करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटिस बजावण्यात आलेल्या असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे. .

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेमार्फत बालवाडी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता थेट पध्दतीने शालेय साहित्याची खरेदी केल्याबाबत**

**(४७) ३२३७९ (०२-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्यावतीने बालवाडी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता शालेय प्रयोग वही, चित्रकला वही, भूगोल नकाशे आणि विविध अभ्यासक्रमांची पूर्ण पुस्तके नियमबाह्यरित्या थेट पद्धतीने खरेदी केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य गत वर्षीच्या पुरवठादारांकडून गत वर्षीच्या दराने खरेदी करण्याची शिफारस आयुक्त व प्रशासन यांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने नव्याने निविदा वर कार्यवाही न करण्याबाबत दिनांक १ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास आदेश दिले असतानाही पिंपरी-चिंचवड

महानगरपालिकेच्या वतीने कोट्यवधी रुपयांचे शालेय साहित्य शैक्षणिक गुणवत्ता विकास या नावाखाली नियमबाह्यरित्या थेट पद्धतीने खरेदी करण्याकरीता माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, थेट पद्धतीने कोट्यवधी रुपयांचे शालेय साहित्य खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने थेट पद्धतीने शालेय साहित्याची खरेदी प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) * शालेय विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक वर्ष सन २०२०-२०२१ साठी प्रयोग वही, चित्रकला वही, भूगोल नकाशा वही आणि विविध अभ्यासपूरक पुस्तके खरेदी करण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया प्रस्तावित करण्यात आली होती.

• तथापि, कोविड-१९ साथ रोगामुळे निविदा कार्यवाही होऊ शकली नाही.

• परंतु ऑनलाईन शिक्षण सुरु झाल्याने व निविदा प्रक्रियेस होणारे विलंब लक्षात घेवून उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार या साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे.

• साथ रोगाची परिस्थिती, निविदा प्रक्रियेला लागणारा विलंब व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये या दृष्टीकोनातून मागील पुरवठा धारकाकडून मागील मंजूर निविदा दराने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली असल्याचे, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

• मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील न्यायप्रविष्ट प्रकरणातील अंतरीम निर्णयामध्ये नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यास मनाई केली होती.

• याबाबत कायदा विभागाची तसेच ज्येष्ठ विधिज्ञ, मा. उच्च न्यायालय यांचे अभिप्राय घेवून गत पुरवठा धारकाकडून सदरचे साहित्य खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली असून मागील निविदा दराने साहित्य खरेदी केल्यामुळे महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसल्याचे आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत

**(४८) ३२३९३ (०२-०९-२०२१). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या रिक्त जागांवर १९८३ च्या सेवानियमानुसार सहाय्यक अभियंता श्रेणी-१ संवर्गातील ११६ पात्र अभियंत्याच्या पदोन्नती देण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.२२०९०/२०१४ नुसार आदेश देवूनही पदोन्नती देण्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ या कालावधीत सेवानियम १९८३ चे पालन करुन सहाय्यक अभियंता श्रेणी-१ संवर्गातील अभियंत्यांच्या पदोन्नत्या करण्यात आल्या आहेत काय, तसेच सेवानियम १९८३ च्या नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता संवर्गातील दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास १७८ रिक्त जागांवर इतर संवर्गातील २३ पात्र अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीनंतर उर्वरित १५५ रिक्त पदांवर सहाय्यक अभियंता श्रेणी-१ संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांची नियमीत व अभावित पदोन्नत्या न करण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ या संवर्गातील अभियंत्यांना उप अभियंता पदावर अभावित पदोन्नती देण्यासाठी जी कार्यपद्धती अंवलंबविण्यात येते तीच कार्यपद्धती सहाय्यक अभियंता, श्रेणी-१ संवर्गातील अभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदावरील पदोन्नतीसाठी अवलंबविण्यात येत नसल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ची रिक्त पदे भरण्याबाबत सहाय्यक अभियंता श्रेणी-१ सरळसेवा प्रविष्ठ वर्ग-२ अभियांत्रिकी अधिकारी संघटना यांनी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-१ व २ (ज्येष्ठतेचे विनियमन सुधारित ज्येष्ठता याद्या तयार व सुधारित करणे) नियम १९८३ या सेवा जेष्टता नियमानुसार अभियांत्रिकी सेवा वर्ग-१ व २ मधील अभियंत्याच्या ज्येष्ठता याद्या तयार करण्यात येतात. तसेच सदर जेष्ठता याद्या विचारात घेऊन पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

(२) सन १९८३ चे सेवानियम नसुन महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-१ व २ (ज्येष्ठतेचे विनियमन सुधारित ज्येष्ठता याद्या तयार व सुधारित करणे ) नियम १९८३ हे ज्येष्ठता नियम आहेत व त्यानुसार तयार करण्यात येणाऱ्या ज्येष्ठता विचारात घेउन पाटबंधारे व वीज विभाग, शासन निर्णय १९.१२.१९७० मधील तरतुदीनुसार पदोन्नत्या करण्यात येतात.

(३) सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सहायक अभियंता, श्रेणी-१ संवर्गातून कार्यकारी अभियंता संवर्गात तदर्थ स्वरूपात पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) होय. हे खरे आहे.

(५) कार्यकारी अभियंता या संवर्गातील मंजुर कोटयानुसार रिक्त पदे निम्न उप अभियंता संवर्गातील पात्र उप अभियंत्यांच्या पदोन्नतीने भरण्यात येतात. त्याव्यतिरिक्त कार्यकारी अभियंता या संवर्गातील रिक्त पदे ही पात्र सहायक अभियंता, श्रेणी-१ या संवर्गातून तदर्थ पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**चिंचपोकळी (मुंबई) रेल्वे स्थानकावरील धोकादायक उड्डाणपुलावरून अवजड वाहनांच्या वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(४९) ३२४०० (०२-०९-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचपोकळी (मुंबई) रेल्वे स्थानकावरील ब्रिटीशकालीन उड्डाणपूल धोकादायक अवस्थेत असल्याने या उड्डाणपुलावरून बेस्ट वगळता इतर अवजड वाहनांच्या वाहतुकीस शासनाने प्रतिबंध केला असतानाही दिवस-रात्र या उड्डाण पुलावरून अवजड वाहनांची वाहतूक सुरु असल्याची गंभीर बाब दिनांक २५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि छत्रपती शिवाजी महाराज स्थानकावरील पादचारी उड्डाणपुलावर घडलेल्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती या उड्डाणपुलावर होवू नये, यासाठी अवजड वाहनांच्या वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी बॅरियर बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) मध्य रेल्वेसाठी केलेल्या पुलांच्या स्थितीदर्शक सर्वेक्षणाच्या आय. आय. टी. बॉम्बेने सादर केलेल्या अहवालात चिंचपोकळी येथील पूल अवजड वाहतुकीसाठी सक्षम नसून फक्त १६ टन वजनापेक्षा कमी वजन असलेल्या वाहनांनाच पुलावरुन वाहतुकीसाठी अनुमती देण्यासाठी सुचविले होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने निधी दिल्यानंतर रेल्वेने सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. सदर काम अंशत: पूर्ण झाले असल्यामुळे सदर पुलावर हाईट-बॅरियर लावावे किंवा कसे याबाबत महानगरपालिकेने रेल्वेकडे विचारणा केली आहे.

रेल्वेकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे तसेच, सदर पुलावरुन बेस्टच्या बसेस वाहतुक करीत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभियंत्यांची चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असतानाही न्यायालयीन निर्णयासापेक्ष पदोन्नती देण्याबाबत**

**(५०) ३२४१० (०२-०९-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अनेक अभियंत्यांच्या चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरणांचा वेळीच निर्णय न झाल्याने त्यांना पदोन्नती न मिळताच सेवानिवृत्त व्हावे लागले असल्याने त्यांना कोणतेही लाभ मिळालेले नसल्याचे वास्तव दिनांक २६ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील बहुतांश अभियंते सद्यस्थितीत पदोन्नतीस पात्र असताना देखील सन २०१५ या कालावधीत त्यांची चौकशी व न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असल्याने सद्यस्थितीत पदोन्नतीपासून वंचित राहिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चौकशी पद्धतीमधील निर्णयाच्या प्रलंबित प्रकियेमुळे महानगरपालिकेतील निर्दोष कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ नये, याकरिता नुकत्याच एका न्यायालयीन प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सह कायदा अधिकारी यांनी 'चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना अंतिम निर्णय बंधनकारक व मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करून पदोन्नती देण्यास हरकत नसल्याचे अभिप्राय दिले असतानाही महानगरपालिका प्रशासनाने अद्यापपर्यंत एकाही अभियंत्यांस पदोन्नती दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी अविरत कार्यरत करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभियंत्यांची चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असतानाही न्यायालयीन निर्णयासापेक्ष पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) दिनांक १५.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दोन अभियंत्यांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्यात आलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.